त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६५, अंक १-४, शक १९०८-०९

सन १९८६-८७
एप्रिल १९८७

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 65, No. 1-4, July. 1986 – April 1987

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधी निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन-लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६५, अंक १-४, शक १९०८-०९

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 65, No. 1-4, July. 1986 - April 1987

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्यांच्या नियमानुसार अनुदान मिळालेले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा
सप्टेंबर १९८७

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
मुद्रक : मा. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

ग. वि. चावरे यांजकडून
सप्रेम भेट

अनुक्रमणिका

१. बद इमिन आणि सप्तसिंधु ५

शुभांगना अत्रे

२. Some Deccani Ragini miniatures acquired by the Salar Jung Museum १६

D. N. Varma

३. स्टुडंट्स् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीचे स्त्री-शिक्षणातील कार्य २४

वर्षा शिरगांवकर

४. टिपणे :

१. सामाजिक इतिहास व चंपूकाव्य ३४
२. इंग्रज पलटणीचा तैनात-खर्च (इ. १७९२-९३) ४०

५. Colonial urban growth and development of imperial policy in the Western Deccan (18th and 19th centuries) ४३

Samita Gupta

६. Water-supply system of Pune in the 18th century ५२

Rekha Ranade

मंडळ – वृत्त ७५

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६५ : १–४, जुलै १९८६–एप्रिल १९८७

बद इमिन आणि सप्तसिंधु

शुभांगना अत्रे

डेक्कन कॉलेज, पुणे


मोहेंजोदडो व हडप्पा येथील उत्खननांमुळे प्रकाशात आलेल्या सिंधु संस्कृतीच्या संदर्भात जे अनेक प्रश्न या संस्कृतीच्या अभ्यासकांपुढे आज उभे आहेत, त्या प्रश्नांची गुरुकिल्ली सिंधु लिपीच्या वाचनात दडलेली आहे असा एक सर्व-साधारण आणि सार्थ समज आहे. सिंधु लिपीच्या वाचनाचा प्रयत्न करणाऱ्या अनेक अभ्यासकांपैकी काही अभ्यासकांनी या लिपीचे प्राचीन सुमेरियन लिपीशी असलेले साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांपैकी किनियर विल्सन[1], मिचनर[2] यांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे प्राचीन सिंधुराज्याच्या तत्कालीन भौगोलिक नावासंबंधी काही निश्चित निष्कर्ष काढता येतात.

या विद्वानांनी सिंधु लिपीतील काही विशिष्ट चिन्हांच्या* द्वारे जे काही निष्कर्ष काढले आहेत त्यात प्रथमदर्शनीच चट्कन लक्षात येते ती गोष्ट अशी की सिंधु राज्य प्राचीन काळी ज्या काही नावाने ओळखले जात होते त्या नावामध्ये ‘सात’ या संख्यावाचक संज्ञेस काही विशिष्ट महत्त्व असावे व सिंधु राज्यातील प्रमुख अशा सात शहरांचा त्या नावात निर्देश असावा. या संदर्भात श्री. जगत्पती जोशी[3] यांनी सिंधु राज्याचे त्याच्या भौगोलिक विस्तारावरून जे सहा विभाग पाडले आहेत ते लक्षात घेण्याजोगे आहेत. त्यांनी पाडलेले विभाग खालीलप्रमाणे :

---

* सदर लेखात वापरलेली चिन्हे


चिन्ह क्र. १


चिन्ह क्र. २


चिन्ह क्र. ३


चिन्ह क्र. ४

लेखात या चिन्हांचा उल्लेख वरील चिन्ह क्रमांकांनी केला आहे.

विभाग	भूप्रदेश	प्रमुख शहर/वसाहत
(१) उत्तर	पंजाब	हडप्पा
(२) पूर्व	राजस्थान हरयाणा	कालीबंगन
(३) मध्य	बहावलपूर	गन्वेरीवाला
(४) दक्षिण	सिंध	मोहेंजोदडो
(५) नैऋत्य	बलुचिस्तान	कुल्ली
(६) आग्नेय	गुजरात	लोथल

भारतखंडाच्या बाहेरचा परंतु सिंधु राज्याच्या बाहेरील व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा बाल्ख हा भूप्रदेश कदाचित सिंधु राज्याचा सातवा विभाग म्हणून वरील यादीत जोडणे शक्य होईल, असे या प्रदेशात नव्याने उजेडात आलेल्या शोर्तुगायसारख्या सिंधु वसाहतींवरून म्हणता येईल.

बद–इमिन :

सिंधु शहरांमध्ये शेकडोंच्या संख्येने सापडलेल्या स्टिअटाईटच्या, भाजक्या मातीच्या तसेच काही तांब्याच्याही मुद्रांवर जी चिन्हे आढळतात तीं म्हणजेच सिंधु लिपी होय. अशी एकूण चारशे सतरा[४] चिन्हे या मुद्रांवर आढळलेली आहेत. किनियर विल्सन यांचे लक्ष त्यांपैकी जोडीने आढळणाऱ्या दोन चिन्हांकडे विशेषत्वाने वेधले गेले. चिन्ह क्र. १ व चिन्ह क्र. २ (एकापुढे एक) ही ती दोन चिन्हांची जोडी होय. या जोडीतील पहिले चिन्ह हे किनियर विल्सन यांच्या मते क्युनिफॉर्मच्याही आधीच्या प्राचीन सुमेरियन लिपीतील एका विशिष्ट चिन्हाशी साम्य दर्शविते. किंबहुना क्र. १ हे चिन्ह क्र. ३ या प्राचीन सुमेरियन चिन्हाची रूपांतरित आवृत्तीच होय. वरील चिन्ह प्राचीन सुमेरियनमध्ये ‘ बद ’ अशा तऱ्हेने वाचले जाईल, व त्याचा अर्थ ‘ भिंत ’ किंवा ‘ तटबंदीयुक्त शहर ’ असा होतो. क्र. ४ हे सिंधु लिपीतील दुसरे एक चिन्ह किनियर विल्सन यांच्या मते क्र. १ या चिन्हाचेच परिवर्तित रूप असून त्याचेही वाचन ‘ बद ’ असेच होईल.

वरील जोडीतील दुसरे चिन्ह, ज्यात खाली तीन व वरती चार याप्रमाणे सात उभ्या रेषा दर्शविलेल्या आहेत, ते क्र. २ हे चिन्ह किनियर विल्सन यांच्या मते सात हा आकडा दर्शविणारे असून हेच चिन्ह सुमेरियन लिपीत असेल तर त्याचे वाचन ‘ इमिन ’ असे होईल. त्यांनी असेही दाखवून दिलेले आहे की दोन ही संख्या सुमेरियनप्रमाणेच प्राचीन भारतीय (Proto–Indian) भाषांमधूनही ‘ मिन ’ या शब्दानेच दर्शविली जात असे. ‘ इमिन ’ या सुमेरियन शब्दाची फोड इअ + मिन म्हणजेच पाच + दोन = सात अशी होते. त्यांच्या मते, मिन म्हणजे दोन या अर्थी दोन्ही भाषांमध्ये एकच संज्ञा उपयोगात आणली जात असेल तर इमिनमध्ये अंतर्भूत

असलेला पहिला शब्द इअ=पाच हाही दोन्हीकडे समान असू शकेल. त्यामुळे क्र. २ या चिन्हाचे वाचन प्राचीन भारतीय (Proto Indian) म्हणजेच सिंधु भाषेतही ' इमिन ' असे करण्यास हरकत नाही.

थोडक्यात क्र. १ व क्र. २ (एकापुढे एक) या चिन्हांच्या जोडीचे वाचन ' बद–इमिन ' असे होईल व बद-इमिन म्हणजे ' तटबंदीयुक्त सात शहरे ' असा त्याचा अर्थ होईल. बद–इमिन किंवा तत्सम अर्थाची संज्ञा प्राचीन सिंधु राज्याच्या भौगोलिक नावाचा निर्देश करणारी होती असे किनियर विल्सन यांच्या विवेचनावरून दिसते.

अरात्ताचा स्वामी, अरात्ता आणि बद्-इमिन :

बद–इमिन हे प्राचीन काळातील एखाद्या भूप्रदेशाचे नाव असावे या निष्कर्षास पुष्टी देणारे काही उल्लेख **एन्मर्कर आणि अरात्ताचा स्वामी**[५] या प्राचीन सुमेरियन काव्यात मिळतात, जे किनियर विल्सन यांनी उद्धृत केलेले आहेत.[६] या महाकाव्यातील प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे अरात्ता शहराचा जो स्वामी, त्याची आराध्यदेवता इनन्ना हिचे स्तवन करताना तिला उद्देशून काही विशेषणे वापरतो. एका विशेषणाद्वारे तो तिचा उल्लेख ' बद–इमिनची सम्राज्ञी ' असा करतो. इनन्ना देवीच्या वास्तव्याने विशेष महत्त्व पावलेला असा हा भूप्रदेश ' बद–इमिन ' अरात्ताच्या पूर्वेला कुठेतरी वसलेला असावा असा कयास या महाकाव्यातील एकूण संदर्भावरून किनियर विल्सन बांधतात. अशा तऱ्हेने बद–इमिनचे भौगोलिक स्थान निश्चित करण्यासाठी प्रथम अरात्ताची स्थलनिश्चिती अपरिहार्य ठरते.

वर उल्लेखिलेल्या महाकाव्यात अरात्ताची ओळख आपल्याला होते ती सोने, चांदी, लॅपिस लॅझुली (इंद्रनीळ), गोमेद इ. मौल्यवान चिजांचा पुरवठा मोठ्या प्रमाणात करू शकणारे केंद्र म्हणून. अशा या शहरी ' अनशन ' पर्वतापासून सात पर्वतांच्या रांगा ओलांडून गेल्यानंतर पोचता येते असा उल्लेख **लुगालबंदा आणि एन्मर्कर** या आणखी एका प्राचीन सुमेरियन महाकाव्यात मिळतो. त्यावरून व इतर माहितीवरून अरात्ता हे शहर पश्चिम पर्शियामध्ये कुठेतरी वसलेले होते हे आता बहुतेक विद्वानांना मान्य झालेले आहे. अरात्ताचे वर उल्लेखिलेल्या मौल्यवान वस्तूंचा पुरवठा करणारे (विशेषत: लॅपिस लॅझुलीचा) केंद्र म्हणून असणारे महत्त्व लक्षात घेतले असता, शिरीन रत्नागर म्हणतात त्याप्रमाणे, अरात्ताची सांगड केरमान, शहादाद किंवा शहर–इ–सोख्ता या शहरांशी घालावीशी वाटेल. परंतु ही शहरे, तिथे लॅपिस लॅझुलीचा आढळ मोठ्या प्रमाणात होत असला तरी, लॅपिस लॅझुलीची उत्पादक नव्हती किंवा लॅपिस लॅझुलीचा व्यापार करणारी नव्हती, तर लॅपिस लॅझुलीची आयात तेथील स्थानिक उपयोगासाठीच केली जात होती. त्यामुळे अरात्ता म्हणजे वरीलपैकी कोणतेच शहर नव्हे हे रत्ना-

गर दाखवून देतात.[७] परंतु सिंधु संस्कृतीचे लोक मात्र लॅपिस लॅझुली स्वत:साठी न वापरता तिचा व्यापारासाठीच जास्त उपयोग करत होते असे अनुमान त्या काढतात.[८]

अरात्ता, आरट्ट आणि बाल्हिक :

अरात्ताची स्थलनिश्चिती करण्याचा आणखी एक महत्त्वाचा प्रयत्न मालती शेंडगे यांनी केलेला दिसतो. महाभारतात पंच नद्यांचा प्रदेश म्हणून ज्याचा उल्लेख आढळतो असा आरट्ट देश म्हणजेच कदाचित प्राचीन अरात्ता असू शकेल असे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे.[९] महत्त्वाची बाब म्हणजे हडप्पासारखे सिंधु संस्कृतीचे महत्त्वाचे केंद्रही याच प्रदेशात वसलेले होते. परंतु अरात्ता म्हणजेच आरट्ट असे निश्चित म्हणता येण्यापूर्वी बऱ्याच गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे.

' एन्मर्कर आणि अरात्ताचा स्वामी ' या महाकाव्यातील वर्णनावरून ध्यानात येणारी गोष्ट म्हणजे अरात्ताच्या रहिवाशांचे शेतीसंबंधीचे अज्ञान. सिंधु शहरांमधील धान्यांच्या प्रचंड कोठारांचे अस्तित्व लक्षात घेता त्या लोकांना धान्योत्पादनाची माहिती नव्हती असे म्हणणे तितकेसे सयुक्तिक वाटत नाही.

दुसरी गोष्ट अशी की आरट्टवासीयांना बाल्हिक म्हणायचे की बाहिक, की वाहिक याबाबत महाभारताच्या निरनिराळ्या आवृत्त्यांत पाठभेद व त्या अनुषंगाने विद्वानांमध्ये मतभेद आहेत. भांडारकर इन्स्टिटयूटने संपादित केलेल्या आवृत्तीतील बाल्हिक हाच पाठ प्रमाण धरला तरी आरट्ट देशाचे बाल्हिक या प्रयोगाचा उलगडा सहजासहजी होत नाही. आरट्ट हे नावही एक विशिष्ट भूप्रदेश दर्शविणारे व बाल्हिक हे नावही एका भूप्रदेशाच्या भौगोलिक नावावरून साधलेले. त्यामुळे आरट्ट देशाचे बाल्हिक असे म्हणण्यात एक प्रकारची द्विरुक्ती होते असे वाटते. या कोडयाचे एक संभाव्य उत्तर म्हणून असे सुचवता येणे शक्य आहे की शिबी, मालव या बाहेरून आलेल्या टोळ्यांप्रमाणे बाल्खचे बाल्हिक पंजाबात येऊन महाभारतकाळापर्यंत स्थायिक झाले असावेत. या संदर्भात, अलेक्झांडरच्या काळापर्यंत सर्वच परकीय लोकांसाठी ' बाल्हिक ' हीच संज्ञा वापरली जात होती हे लक्षात घेण्याजोगे आहे.[१०] त्यामुळे असे म्हणता येईल की बाल्हिक हे बाल्खचे. परंतु ते पंजाबात येऊन स्थायिक झाल्यावर त्यांनी त्यांच्या नवीन भूमीस त्यांच्या मूळ देशातील प्रमुख वसाहतीचे नाव दिले असावे व कालांतराने अरात्ताचे आरट्ट असे रूपांतर झाले असावे. या आरट्टचेच पुढे ' अराष्ट्र ' असे संस्कृतीकरणही झालेले आढळते.[११] अराष्ट्र ही गणराज्यासाठी वापरली गेलेली पर्यायी संज्ञा होती हे विशेष. आरट्ट हे अलेक्झांडरच्या आगमनापर्यंत गणराज्य म्हणूनच अस्तित्वात असल्याचा उल्लेख मिळतो.[१२] मूळ बाल्खमधील अरात्ता हे गणराज्यच होते हे एकूण वर्णनावरून उघड आहे. **' एन्मर्कर आणि अरात्ताचा स्वामी '** या महाकाव्यात राज्यातील ज्येष्ठ

मंडळींच्या सभेचा उल्लेख आहे,[१३] व या सभेत राज्यकारभारासंबंधीचे महत्त्वाचे निर्णय घेतले जात असे दिसते. त्याचप्रमाणे अरात्ताचा स्वामी हा प्रमुख शासनकर्ता असला तरी तो प्रस्थापित अर्थाने तेथील राजा होता असे दिसत नाही.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर अरात्ता म्हणजेच आरट्ट नव्हे, असे असले तरी प्राचीन अरात्ता व महाभारतकालीन आरट्ट यांचा अत्यंत जवळचा संबंध होता असे लक्षात येते. दोन्ही प्रदेशातील धार्मिक रीतीरिवाज व रूढी यांचे स्पष्ट वर्णन कुठेच मिळत नसले तरी महाभारतातील काही श्लोकांच्या आधारे आरट्ट-वासीयांच्या धार्मिक आचारांवर काही प्रकाश पडतो असे म्हणता येईल.[१४] कर्णपर्वात येणारे हे श्लोक पुढीलप्रमाणे आहेत :

धानगौडासवे पीत्वा गोमांसं लशुनैसह ।
अपूपमांसवाटयानामशिनः शीलवर्जितः ।।१५।।
हसन्ति गान्ति नृत्यन्ति स्त्रीभिर्मत्ता विवाससः ।
नगरागारवप्रेषु बहिर्माल्यानुलेपनाः ।।१६।।
मत्तापगीतैर्विविधैः खरोष्ट्रनिनदोपमैः ।
आहुरन्योन्यमुक्तानि प्रबुवाजा मदोत्कटाः ।।१७।।
हा हते हा हतेचैव स्वामिभर्तृहतेतिच ।
आक्रोशन्त्यः प्रनृत्यन्ति मन्दाः पर्वस्वसंयताः ।।१८।।

शेवटच्या श्लोकातील **पर्वस्वसंयताः** या शब्दावरून, आरट्टवासीयांचे, महा-भारतकालीन आर्यांच्या दृष्टीने गर्हणीय असलेले वर्तन हे त्यांच्या नित्याच्या दैनंदिन जीवनाचा भाग नसून काही विशिष्ट प्रसंगांच्या (पर्व) अनुषंगानेच दृष्टोत्पत्तीस पडणारे असे होते, ही गोष्ट उघड आहे. अशा प्रकारच्या वर्तनात स्त्रियांचा सहभाग मोठा होता हेही लक्षात घेण्याजोगे आहे. काही विशिष्ट प्रसंगी असभ्य वाटावे असे वागणे हे प्राचीन समाजात सुगीच्या सणांच्या काळातील विशिष्ट संकेतांना धरून असे. त्यामागील भावना ही धनधान्यपशू इ. च्या समृद्धीशी निगडित होती हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. आपल्याकडील होळीचा सण हाही अशा प्राचीन प्रथांचे अवशिष्ट स्वरूपच आहे. ख्रिस्तपूर्व युरोपातही अशा प्रकारचे अनेक विधी प्रचलित होते. याचे ठळक उदाहरण म्हणून प्राचीन ग्रीसमधील 'थेस्मोफोरिया' या उत्सवाचा उल्लेख करता येईल. हा उत्सव शेतकऱ्यांच्या सुगीच्या सणांशी निगडित तर होताच, परंतु वरील श्लोकांमध्ये वर्णन केल्याप्रमाणेच या उत्सवात स्त्रिया प्रामुख्याने भाग घेत असत. रानटी वाटतील अशा प्रकारच्या नाचगाण्यांच्या जल्लोषात, बीभत्स अशा आरडाओरड्यात स्वतःला मुक्तपणे झोकून देत असत. या सर्वांमागचा हेतू वर सांगितल्याप्रमाणे धनधान्यपशू, इ. ची विपुलता व्हावी हाच असे. बाल्हिकांच्या सकृद्दर्शनी विचित्र वाटणाऱ्या आचारांमागेही हीच भूमिका असावी. अशा प्रकारचे धार्मिक आचार असणाऱ्या प्राचीन समाजांमध्ये सर्वसाधारण-

पणे मातृदेवतांचे प्राबल्य अधिक असे व त्यामुळे आरट्टवासीय बाल्हिक हे मातृदेवतेचे उपासक असावेत असे अनुमान निघते. त्यात फारसे आश्चर्य असे काहीच नाही. कारण मूळ अरात्ता शहराची अधिष्ठात्री देवता इनन्ना ही मातृदेवताच होती व आरट्टवासीयांनी अरात्ताहून स्थलांतर केल्यानंतरही आपली मूळ धार्मिक परंपरा दीर्घकाळ जपली असणारच.

वरील सर्व विवेचनावरून महाभारतकालीन आरट्टवासीय हे मुळातील बाल्खचे वा अरात्ताचे रहिवासी असावेत व महाभारतकाळापर्यंत ते स्थलांतर करीत पंजाबात येऊन तेथेच स्थायिक झाले असावेत या अनुमानास पुष्टी मिळते. अरात्ता हे अशा प्रकारे बाल्खमध्ये वसलेले होते हे निश्चित झाल्यानंतर अरात्ताचा सोने, चांदी, लॅपिस लॅझुली, गोमेद इ. मौल्यवान वस्तूंचा पुरवठा करणारे केंद्र म्हणून जो उल्लेख होतो तो सार्थ वाटतो. लॅपिस लॅझुलीचे उत्पादन होणाऱ्या बदक्शान खाणी, जिच्या पात्रातून सोने गोळा केले जात असे ती कोक्चा नदी, गोमेदसाठी शहर-इ-सोख्ता व चांदीसाठी शहादाद, या ठिकाणाहून अरात्ताचे स्थान मध्यवर्ती व कोठूनही पोचण्यास सोयीचे असेच होते.

या संदर्भात लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे या प्रदेशातील शोर्तुगायसारख्या[१५] सिंधु वसाहती. कदाचित् बाल्खमधील सिंधु वसाहतींचा उल्लेख अरात्ता म्हणून केला गेला असण्याची शक्यता आहे. काही असले तरी अरात्ता हे बाल्खमधील व बद-इमिन त्याच्या पूर्वेचा म्हणजे भारतखंडातील सिंधु संस्कृतीने व्यापलेला भूप्रदेश असे म्हणण्यास फारसा प्रत्यवाय नसावा.

सप्तसिंधु : उंचावरील सात शहरे

मिचनर या अभ्यासकाने सात आकडा दर्शविणाऱ्या क्र. २ या चिन्हाचा, ते ज्या ज्या लेखात आढळले त्या त्या प्रत्येक लेखाचा अभ्यास केला व क्र. १ व क्र. २ या जोडीखेरीज इतरही काही जोड्या या बद-इमिनच्या समानार्थी संज्ञा दर्शविणाऱ्या असाव्यात असे मत व्यक्त केले.[१६] त्यांच्या मते या चिन्हांनी दर्शविल्या जाणाऱ्या संज्ञांचा अर्थ 'उंचावरील सात स्थळे' (Seven High Places) असा असावा. त्या संदर्भात ते, बेली या विद्वानाने सप्तसिंधु या शब्दाचा अर्थ 'उंचावरील सात स्थळे' असा केला आहे याचा उल्लेख करतात. ऋग्वेदात येणारा 'सप्तसिंधु' किंवा अवेस्तात येणारा 'हप्तहिंदु' या शब्दाच्या व्युत्पत्तीचा अभ्यास करून बेलीने[१७] असे सुचविलेले आहे की सिंधु हा शब्द 'सेध'पासून साधलेला असावा. शतपथ ब्राह्मणात आढळणाऱ्या 'उत्सेध' या शब्दाचा अर्थ 'पर्वत' किंवा 'उंचवटा' वगैरे असल्याचा उल्लेख करून, सप्तसिंधु ही संज्ञा सात नद्या वगैरे दर्शविणारी नसून एखाद्या विशिष्ट भूप्रदेशाचे-ज्यात मुद्दाम बांधलेल्या चबुतऱ्यावर वसलेल्या अशा सात शहरांचा समावेश होतो—निर्देशन करणारी असावी असा

निष्कर्ष त्यांनी काढला. सिंधु शहरेही, विशेषतः त्यांचे बालेकिल्ले, अशा प्रकारे मुद्दाम बांधलेल्या उंच चबुतऱ्यांवर वसविलेले असत. हा या बाबतीतला निव्वळ योगायोगाचा भाग वाटत नाही. त्यामुळे बेली यांनी असे सुचवले आहे की सिंधु-राज्यासाठी ‘ सप्तसिंधु ’ किंवा तत्सम अर्थाचे एखादे भौगोलिक नाव प्रचारात असावे व नंतर आलेल्या आर्यांनीही त्याच नावाचा उपयोग केला असावा.

मोहेंजोदडोचे या सात शहरांमधील विशेष स्थान :

मिचनरने सिंधु मुद्रांवरील लेखांचे विश्लेषण करून आणखी एक महत्त्वाचा निष्कर्ष काढला तो असा की सिंधुराज्यात राज्यकारभाराच्या दृष्टीने मोहेंजोदडो या शहरास मध्यवर्ती असे महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले होते. त्याने केलेल्या विश्लेषणावरून असे दिसून येते की सिंधु राज्याचे भौगोलिक नाव उद्घोषित करणाऱ्या एकूण चौतीस लेखांपैकी एकोणतीस लेख हे एकट्या मोहेंजोदडो येथे सापडलेल्या मुद्रांवर आढळले. क्र. १ या चिन्हाचेच परिवर्तित रूप असे क्र. ४ हे चिन्ह क्र. २ या चिन्हाच्या जोडीने ज्या मुद्रांवर आढळले अशा एकूण दहा मुद्रांपैकी सहा मुद्रा मोहेंजोदडो येथे मिळाल्या. मिचनरच्या मते वरील आकडेवारी मोहेंजोदडोचे सिंधुराज्याच्या कारभारातील महत्त्वाचे स्थान दर्शविते. शिरीन रत्नागर यांनी सिंधु शहरांमध्ये सापडलेल्या ठशांचे वर्गीकरण केलेले आहे. त्यांपैकी काही ठसे हे विशिष्ट प्रकारच्या शासकीय संदेशांची नोंद करणारे आहेत. या प्रकारचे ठसे हडप्पा व मोहेंजोदडो इथे जास्त प्रमाणात मिळतात त्यावरून त्यांनी असे सुचविले की हडप्पा व मोहेंजोदडो ही सिंधु राज्याच्या व्यवस्थापनाची केंद्रे असावीत. परंतु त्यातही मोहेंजोदडो हे जास्त प्राचीन व मूळ केंद्र होते हे मार्सिया फेन्ट्रेस यांनी काढलेल्या निष्कर्षांवरून दिसून येते.[१८] त्यांनी दाखविल्याप्रमाणे हडप्पा हे मोहेंजोदडोनंतर उदयाला आलेले व भरभराट पावलेले असे शहर होते. त्यांच्या या निष्कर्षाच्या पुष्ट्यर्थ फारशा C–14 तारखा आज उपलब्ध नसल्या तरी त्यांनी मातीच्या भांड्यातील बदलांच्या टप्प्यांचा उपयोग करून घेतला व असे निदर्शनास आणून दिले की जमिनीच्या मूळ स्तरापासून फारशा उंचीवर नसलेला हडप्पा येथील अशा प्रकारचा पहिल्या टप्प्याशी जुळणारा टप्पा मोहेंजोदडो इथे जिथे आढळतो त्या स्तराच्याही खाली जवळ जवळ आठ ते नऊ मीटर उंचीचा मातीचा ढीग शिल्लक रहातो. यावरून, मोहेंजोदडोची नागरी संस्कृती पूर्णत्वाला पोहचून हडप्पासारखे दुसरे केंद्र विकसित करण्याची गरज भासण्याअगोदरचा मोहेंजोदडोचा घडणीचा काळ हा कितीतरी मोठा होता, असे म्हणता येते व त्यावरून मोहेंजोदडोचे हडप्पाच्या तुलनेने असलेले प्राचीनत्व सिद्ध होते. साहजिकच मोहेंजोदडो हे सिंधू नागरी संस्कृतीचे व सिंधू राज्याच्या व्यवस्थापनाचे आदिकेंद्र होते असे म्हणावे लागते.

अशा प्रकारचे महत्त्व प्रस्थापित करणारा अन्यही काही पुरातत्त्वीय पुरावा आढळतो का हे पाहणे या संदर्भात महत्त्वाचे ठरते.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे क्र. १ व २ (एकापुढे एक) किंवा क्र. ४ व २ (एकापुढे एक) ही चिन्हे ज्यांच्यावरील लेखात आढळतात अशा मुद्रा मोहेंजोदडो येथे अधिकाधिक संख्येने उपलब्ध झालेल्या आहेत. वरील चिन्हांची वैयक्तिकरीत्या गणती केली असता मोहेंजोदडो येथेच ती जास्त संख्येने आढळतात हे पुढील तक्त्यावरून[१९] स्पष्ट होईल.

चिन्ह	मोहेंजोदडो	हडप्पा	लोथल	कालीबंगन
क्र. १	४१	११	२	३
क्र. ४	३४	१८	७	—
क्र. २	३९	२२	२	३

ही चिन्हे जेव्हा जोडीने येतात तेव्हा :

	मोहेंजोदडो	हडप्पा	लोथल	कालीबंगन
क्र. १ व २ (एकापुढे एक) किंवा क्र. ४ व २ (एकापुढे एक)	३४	८	१	२

यावरून क्र. १ व २ ही चिन्हांची जोडी मोहेंजोदडो यथील मुद्रांशी अधिक निगडित होती हे स्पष्ट आहे. किनियर विल्सन व मिचनर यांनी दाखविल्याप्रमाणे वरील चिन्हे ही सर्वोच्च सत्ताधिकाराची निदर्शक असावीत असे गृहीत धरल्यास मोहेंजोदडोचे महत्त्व आपोआपच स्पष्ट होते. त्या दृष्टीने वरील चिन्हे ज्यांवर आहेत अशा मुद्रा जेथे सापडल्या त्या वास्तू काही विशेष महत्त्वाच्या होत्या काय हे पहाण्याचा प्रयत्न केला असता ज्या गोष्टी आढळून आल्या त्या अशा :

(१) सर्वाधिक मुद्रा (२६ पैकी १८) या मोहेंजोदडोच्या दक्षिण भागातून (विभाग : DK, उपविभाग G) आल्या आहेत.

(२) या विभागातील विशिष्ट इमारतींचा समूह हा तेथील प्राचीन राजवाडा असावा.[२०] त्याला संलग्न असणाऱ्या वास्तूंच्या बांधणीवरून त्या शासकीय कचेऱ्या किंवा इतर शासकीय महत्त्वाच्या इमारती असाव्यात.

(३) अशा या वास्तूसमूहात DK ४९६७ व A १४८ या दोन मुद्रा सापडल्या.

(४) DK विभागाच्या पश्चिम बाजूस लागूनच असणारा व पूर्व-पश्चिम दिशेने खोदलेला 'इ' हा चाचणी खड्डा व तेथील वास्तू ही अत्यंत महत्त्वाची आहे, कारण तिचे वर्णन 'मंदिरासंबंधीच्या आजच्या संकल्पनेशी जास्तीतजास्त जवळची' असे केलेले आहे. या वास्तूला संलग्न अशा एका ओळीत असलेल्या तीन विहिरी या बहुधा भाविकांच्या पादप्रक्षालनासाठी बांधलेल्या होत्या.

DK विभाग व त्याच्याशी संलग्न अशा भागात एकवटलेल्या या महत्त्वाच्या इमारती पाहिल्या म्हणजे सहजच आठवण होते ती प्राचीन ग्रीक शहरातील 'अॅगोरा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रमुख चौकाची. यामध्ये व्यापारी, शासकीय, मनोरंजनासाठी बांधलेल्या, धार्मिक इ. सर्व प्रकारच्या इमारतींचा समावेश असे. मोहेंजोदडोचा DK विभाग हा अशाच प्रकारचा शहरातील सांस्कृतिक व राजकीय जीवनाचे जणू केंद्रच असा होता असे दिसते. असे असेल तर आपण एका महत्त्वाच्या निष्कर्षापर्यंत पोचतो, तो असा की शासकीय व्यवस्थापनासाठी शहरातील एक विभाग स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात आला होता व मोहेंजोदडोच्या शास्ते-धर्मगुरूंचा जरी बालेकिल्ल्यात निवास असला तरी राज्याच्या व्यवस्थापनाचे कार्य मात्र शहरातील मध्यवर्ती अशा विभागात स्वतंत्रपणे उभारलेल्या शासकीय कचेऱ्यांमधूनच ते करीत असत.

हडप्पा हे राज्यव्यवस्थापनाचे दुय्यम केंद्र असल्यामुळे व तेथील कारभाराचा व्याप कदाचित मोहेंजोदडोपेक्षा कमी असल्यामुळे असेल, मोहेंजोदडोप्रमाणे शासकीय कचेऱ्यांसाठी एखादा स्वतंत्र विभाग शहरात राखून ठेवलेला आढळत नाही. परंतु शासकीय स्वरूपाच्या म्हणता येतील अशा इमारती बालेकिल्ल्यास लागूनच उभारल्या होत्या असे तेथील धान्याची कोठारे व त्याला लागून असणाऱ्या इतर वास्तूंवरून म्हणता येईल. या वास्तूंचा विशेष असा की निवासासाठी लागतील अशा वस्तू तेथे अभावानेच आढळल्या. मोहेंजोदडो येथे बालेकिल्ल्यात, आपण विचारात घेतलेल्या मुद्रांपैकी एकही मुद्रा आढळली नाही, तर हडप्पा येथे बालेकिल्ल्यात तीन व वर उल्लेखिलेल्या वास्तुसमूहात चार मुद्रा आढळल्या. यावरून येथील कारभार तेथील शास्ते-धर्मगुरू अंशतः बालेकिल्ल्यातून व अंशतः किल्ल्याबाहेरील शासकीय इमारतींतून करत असावेत. या गोष्टींवरूनही मोहेंजोदडोचे सिंधु राज्यातील कारभाराच्या दृष्टीने असलेले प्रमुख स्थान लक्षात येते.

■ ■

संदर्भ :

१. किनियर विल्सन, जे. व्ही., इण्डो-सुमेरियन (ऑक्सफर्ड, १९७४).
२. मिचनर, जॉन इ., स्टडीज इन द इण्डस् व्हॅली सिव्हिलायझेशन (नवी दिल्ली, १९७८)
३. जोशी, जगत्पती, 'हडप्पा कल्चर : इमर्जन्स ऑफ ए न्यू पिक्चर' आर्कें‌ऑलॉजिकल पर्स्पेक्टिव्ह ऑफ इंडिया सिन्स इंडिपेन्डन्स या विषयावर इन्डियन आर्केऑलॉजिकल सोसायटी आणि इण्डियन सोसायटी ऑफ प्रिहिस्टॉरिक अॅण्ड क्वाटर्नरी स्टडीज यांच्यातर्फे दिल्ली येथे भरविण्यात आलेल्या चर्चासत्रात वाचला गेलेला निबंध—२५ ते २७ ऑक्टोबर, १९८२, नॅशनल म्युझियम, नवी दिल्ली.

४. महादेवन् इ., द इन्दस् स्क्रिप्ट : टेक्स्टस्, कन्कॉर्डन्स अँड टेबल्स् (नवी दिल्ली, १९७७), पृ. १४

५. क्रॅमर एस्. एन्., एन्मर्कर अँड द लॉर्ड ऑफ अरात्ता, (म्युझियम मोनोग्रॉफस्, पेनसिल्व्हानिया, फिलाडेल्फिया, १९५२)

६. किनियर विल्सन (१९७४), पृ. ५.

७ व ८. रत्नागर शिरीन, एन्काऊन्टर्स : द वेस्टर्ली ट्रेड ऑफ द हरप्पन सिव्हिलायझेशन, (दिल्ली, १९८१), पृ. १३६ व १३८.

९. शेंडगे मालती, द सिव्हिलाइज्ड डेमन्स : द हराप्पन्स इन ऋग्वेद, (नवी दिल्ली, १९७७) पृ. ३९२–३.

१०. टार्न डब्ल्यू. डब्ल्यू., द ग्रीक्स इन बॅक्ट्रिया अँड इंडिया, (लंडन, १९३८), पृ. १२०–५ ते १२८

११. बाजपेयी के. डी, द एन्सायक्लोपिडिया ऑफ एन्शन्ट अँड मिडिएव्हल इंडिया, (वाराणसी, १९६७), पृ. ३१

१२. टार्न डब्ल्यू. डब्ल्यू., उपरोक्त, पृ. १६९

१३. क्रॅमर एस. एन., उपरोक्त, पृ. ३

१४. कर्णपर्व ८.३०, महाभारत-संपादक-सुखटणकर व्ही. एस. व बेलवलकर एस. के., (पुणे, १९५४, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था), खंड १०, श्लोक १५–१८.

१५. डयुप्री लुई, "नोटस् ऑन शोर्तृगाय : ॲन हरप्पन साईट इन नॉर्दर्न अफगाणिस्तान"–इन्दस सिव्हिलायझेशन : न्यू पर्स्पेक्टिव्हज् (इस्लामाबाद, पाकिस्तान, १९८१) (संपादक : ए. एच्. दाणी), पृ. १०८

१६. मिचनर, उपरोक्त, पृ. २५ ते २७

१७. वेली एच्. डब्ल्यू., 'इन्डियन सिंधु–इराणियन हिन्दु', बुलेटिन ऑफ द स्कूल ऑफ ओरिएन्टल अँड आफ्रिकन स्टडीज, खंड ३८, १९७५, पृ. ६१०–१.

१८. फेन्ट्रेस मार्सिया, 'रिजनल इन्टरॲक्शन इन इण्डस व्हॅली : अर्बनायझेशन, द की फॅक्टर्स ऑफ रिसोर्स, ॲक्सेस अँण्ड एक्स्चेंज' (अमेरिकन स्टडीज इन द ॲन्थ्रॉपॉलॉजी ऑफ इण्डिया, संपादक—सिल्व्हिया वाटुक), (नवी दिल्ली, १९७८), पृ. ३९९–४००.

१९. महादेवन इ., उपरोक्त

२०. मॅके इ. जे. एच्., फर्दर एक्स्कॅव्हेशन्स् अँट मोहेंजोदडो, (१९३८), खंड १, पृ. २५.

Summary

' Bad-Imin ' and seven regions of Indus civilization

'Bad', in ancient Sumerian, meant a wall or a walled city, and ' Imin ' meant seven. Therefore, a pair of these two orthographical signs meant a region of seven walled cities.

The goddess of the region of Aratta was described as the Empress of ' Bad-Imin '. The Arattas mentioned in the Mahabharat appear to be the original residents of Aratta or Balkha, who migrated to and settled in Punjab by the Mahabharat times.

' Bad–Imin ' can also be interpreted to mean a region of seven high places. Mohenjodado appears to be its most important central city. The seals carrying the orthographical signs of ' Bad–Imin ' are found more in number at Mohenjodado than at Hadappa, Lothal or Kalibangan. The remains at Mohenjodado also indicate that it must have been the most important central city culturally, politically and administratively.

■ ■ ■

BISM Quarterly 65 : 1–4, July 1986–April 1987

Some Deccani Ragini miniatures acquired by the Salar Jung Museum

D. N. Varma
Hyderabad

We do not know for certain whether it was the Deccan where the idea of giving a visual shape to Ragas and Raginis originated for the first time, [1] but some two dozen miniatures, having visualised music as their theme, have survived to prove that the theme was a cherished one in the late sixteenth century in the Deccani courts.

Different scholars have suggested[2] different centres as the place of origin of these miniatures, but Bijapur has quite a claim as the place of execution of at least some of these miniatures on account of Ibrahim Adil Shah II's (A. D. 1580–1627) infatuation with music. He called himself Jagat Guru, was an excellent Veena player and his work *Kitab-i-Nauras* deals with pen-portraits of quite a few Ragas and Raginis which are in no way a slavish imitation of prevalent Sanskrit shlokas dealing with dhyanas of Ragas and Raginis. He is also known to have been an accomplished calligrapher and a patron of painters and paintings.

One should have imagined that with such a lively personality at the helm of affairs, scores of painters would be out-beating one another in the production of Ragamala paintings at Bijapur and a veritable treasure of such works would be available to posterity. However, in fact very few sets of that century have survived. Among them are the famous Laud Ragamala set whose provenance is disputed and a five folio set from Bijapur, C. 1680, formerly in the

Khajanchi collection. Only later in the 18th century, do we find an abundance of Deccani Ragamala painting emanating mostly from Hyderabad.[3] Only a few of these sets are complete. The inconography of different sets shows minor variations, but the style of each set has its individuality which is identifiable.

It would thus be evident that every single Deccani Raga —Ragini painting of the seventeenth century is fraught with significance in tracing the evolution of this theme in the Deccan. Even eighteenth century Raga Ragini pictures would be an important source for reconstructing the area of influence of this theme in the Deccan if they were painted at centres other than Hyderabad. Added to these would be specimens executed by Rajastani painters for their Rajastani patrons stationed in the Deccan with the Mughal army, or alternately the works of Deccani artists absorbed in the entourage of the Rajastani chieftains, as they returned home from their campaigns in the South. At least one Ragamala series painted for Raja Karan Singh of Bikaner in A. D. 1660 at Daulatabad has been cited as a parallel for fixing the date and place of origin of another similar set.[4]

The Salar Jung Museum has acquired some Deccani Raga and Ragini pictures in recent years which need not go unnoticed specially when the background is so exciting. The first miniature is numbered 72.34 and reminds one of the Ghanerao Group.[5] The central figure in this miniature is a standing maiden who has her arms raised over her head. She is attended by two standing females on either side who have toilet accessories in their hands. The baekdrop is that of a pavilion, two slender pillars of which divide the pictorial area in three parts—the central area for the princess with upraised arms and the side parts for the female attendants. The wall behind has a central door and half portions of doors have been represented on either side. The wall has a

preponderance of alcoves set with coloured bottles in them. Female figures wear a rather short blouse, a ghaghara and a dupatta. They wear pearls in the ear lobes and nose and also a necklace of pearls besides chudis.

After the discovery of an illustrated Rasmanjari painted at Aurangabad[6] in A. D. 1650, which is very similar to paintings of the Ghanerao Group, there should be no difficulty in assigning provenance of this painting to Aurangabad. Only the treatment being more sophisticated, its date would be around A. D. 1670.

This miniature does not carry any inscription or label identifying it as a Ragini painting, but the iconographic formula of a lady with upraised arms is so well known to students of Raga Ragini paintings that there is hardly any room for doubt that it is Desavarati Ragini of Raga Dipak. In Hanuman's system, Ragini Vilaval of Raga Hindola is also represented as a lady with upraised arms, but one of female attendants is represented showing a mirror to the lady. However, in Sirohi Ragamala miniatures, even Desavarati iconography includes the mirror, though its name is changed to Vihagado. There cannot be any doubt that Vihagado is the same as Desavarati because the folio number remains 24 as the last Ragini of the fourth Raga, each one having five Raginis for their consorts. The fact is that Desavarati or Desavarari became extinct as a musical mode sometimes in the 17th or 18th century and painters replaced the name with that of a Ragini popular in that region retaining the iconography. This is exactly the condition of a picture drawn at Hyderabad in the 18th century available in the collection of the Salar Jung Museum and referred to as Syam Kalyana. In 19 th century Jaipur pictures it was called Purvi. There is hardly any doubt that the picture under discussion should have been Desavarati because its Dhyana describes it in the Manley and Chawanda Ragamala sets as, " At ease

and in silence, her body twisted as the creeper, arms upstretched and rolling eyes such shall be Desavarati, the fair one."[8]

The next Deccani Ragini miniature under discussion is numbered 73.86. It depicts a heroine sleeping on a couch in a pavilion. She is attended by a female attendant. On the left end of the miniature we find the hero in a standing posture looking back at the heroine. He carries two garlands in his hands. The painting has an inscrption in Devanagari characters describing it as Ragini Vibhasa.

The general treatment of the painting, the mauve colour under the bed, the green background provided for the hero, the folded curtain, the dress ornamentation and the ethnic type of females, all taken into consideration would put the painting's date about 1660 A. D. and its place of execution would once again be Aurangabad.

As far as the name of the Ragini is concerned the label writer has definitely committed a mistake. Ragini Vibhasa is usually associated with a hero who carries a bow and an arrow in his hands and not garlands. The painting of Ragini Vibhasa in Vijayendra Suri's collection has a braj bhasha couplet which would mean, " seated on his wife's bed, he engages in love's sport," lovely, holding the flower bow in his hand, the Vibhasa Raga.[9]

This conception of the musical mode is maintained in the Chawand Ragamala set,[10] in the Laud Ragamala set and the Manley Ragamala set. The Johnson Album 43 shows a variation where the hero is offering a cup of wine to the heroine in a pavilion,[12] but the Gem palace collection set and two other representations of the Ragini in Gopikrishna Kanoria's collection continue the bow and arrows tradition. Nowhere do we come across a representation where garlands are associated with the hero in the treatment of this Ragini.

On the other hand, there is no dearth of representations of Lalita Ragini where the hero has been shown carrying

garlands in his hands. The Chawanda Ragamala of 1605 in Kanoria's collection,[14] a miniature of 1628 from Bikaner in Khajanchi collection, the Manley Ragamala and innumerable others show the hero with garlands in both hands. In fact, the Manley collection representation has a Sanskrit couplet which would mean, "Bearing a garland of Sapta chhada (Astonia scholaris) blossom the youth, his eyes bright and shining, and wearing his festal garb, departs in the morning from the bridal chamber. He is said to be Lalita."[15]

It would thus appear that while the Ragamala theme was quite popular at Aurangabad in the middle of the seventeenth century, mistakes in labelling were also possible at that centre.

Miniature painting numbered 73.65 depicts an ascetic with a beard and matted locks sitting in the padmasana, holding a rosary in his extended right hand. In the background are two temples on either side and a mango tree in the centre, below which sits the sage. A peacock with its raised colourful tail is looking intently at the Sadhu's rosary.

The ascetic figure is common to Devagandhar, Bangal and Setmalar Raginis and they are often confused with one another for lack of distinct features. Poets describe Ragini Devagandhar as a longing wife who has prayed so fervently for the return of her husband and has practised austerities for so long to appease the gods that she turned into an ascetic with matted hair and ash-besmeared body. The painters could not visualise an ascetic without a beard and thus the longing wife turned into a bearded ascetic at the painter's hand. The same confusion can be seen in the painter's visualisation of Bangal. The poets describe her as a young ascetic and the painters usually associated the ascetic with a tame tiger, lion or leopard, but the confusion whether the ascetic is a man or woman continued and Sirohi painters represented her as a lady receiving ritual

instruction from a Brahmin.[16]

The painting under discussion has a visual clue in the form of the dancing peacock. Setmalhar is a melodic pattern associated with the rainy season. Thus the phenomena associated with rain and clouds provide the visual clue in the representations of this Ragini. One of the earliest Ragamalas from Bharat Kala Bhavan[17] dated 1575 associates peacocks with this Ragini, as do the Chawand Ragamala, the Manley Ragamala, the Johnson Album 43 and a 1630 A. D. representation from Malwa in the Metropolitan Museum of Art, New York [18] All these representations have the ascetic also.

The stylistic features of this painting, the colours, the architecture, the treatment of the mango tree etc. would enable the painting to be dated around 1725 A. D. and its provenance would most probably be Bidar.

Yet another place in the Deccan which is not so well known for the production of Raga-Ragini pictures, or for that matter miniatures in general appears to be Kurnool. Painting No. 73·64 in the collection of the Salar Jung Museum depicts the Ragini Kanada. It shows a king standing in the centre of the pictorial area holding a sword in the right hand and a shield in the left hand. Two attendants with lances and swords in their hands are saying something to the king and near his feet is visible a pair of tusks of an elephant. The elephant itself without the tusks has been shown at bottom left hand of the picture. Such representations of this Ragini are by no means unknown in other schools, but what would connect it with Kurnool is the wavy treatment of the clouds across the pictorial area on the top of the painting which engulfs a crescent moon executed in gold. The painting could be dated around 1775 A. D.

All these paintings taken together are so few in number that one should not be tempted to put forward a generalised conclusion; but taken individually they do prove that the

iconographic formulae of Ragamala paintings continued to inspire the Aurangabad painters in the middle of the 17th century and the fashion spread to the outlying areas in later years.

■ ■

Notes and References :

1. At one time Karl Khandalwala and Dr. Moti Chandra thought that it was Ibrahim Adil Shah II of Bijapur who first got the paintings of the Raga Ragini theme painted. See Dr. Moti Chandra's article 'Portraits of Ibrahim Adil Shah II' in the quatrerly journal **Marg,** Vol. 5, No. 1. (Bombay), pp. 27–28 and Khandalwala's article 'Five miniatures in the collection of Sir Cowasji Jehangir' in the same quarterly journal, Vol. 5. No. 2. pp. 27-28.
2. Basil Gray, **The art of India and Pakistan**, p. 145
D. Barret, **Paintings of the Deccan.**, pl. 4.
G. Goetz, **Art and architecture of Bikaner State**, (Oxford, 1950), p. 19.
S. Kramrisch, **The art of India**, p. 29.
3. Such sets can be seen in the State Museum and Salar Jung Museum of Hyderabad, Indian Museum of Calcutta, Prince of Wales Museum of Bombay, Municipal Museum of Hyderabad, besides some private collections.
4. H. Goetz, " Mewar ", **Marg**, Vol. 11, No. 2, (Bombay, March 1958); p. 41.
5 K. Khandalwala, Moti Chandra and Pramod Chandra, **Miniature paintiugs**, p. 58, No. 141.
6. Sarayu Doshi, " An illustrated manuscript from Aurangabad dated 1550 A. D. ", Lalit Kala No. 15, (New Delhi, 1972), pp. 19–28.

7. Salar Jung Museum, No. 29/32
8. Ebling Klaus, **Ragamala paintings**, (New Delhi, 1975), p. 124.
9. W. N. Brown, " Some early Rajasthani Raga paintings ", Journal of Indian Society of Oriental Art (JISOA), Vol. 16, (Calcutta, 1948), p. 10.
10. G. K. Kanoria, " An early dated Rajasthani ragamala ", JISOA, Vol. 19 (1952), pp. 1-5.
11. Stooke and Khandalwala, **Laud ragamala miniatures**, (Oxford, 1953), pp. 8-16.
12. Available in India Office Library, London.
13. Kanoria, **op. cit.**
14. Barret and Gray, " La Peinture Indienne. "
15. Ebling Klaus, **op. cit.**
16. **Ibid**, pl. C.4 1.
17. Krishna Anand, " An early ragamala series ", **Ars Orientalis**, Vol. 4. (Michigan, U. S. A, 1961), pp. 368–72.
18. For Dhyana see O. C. Gangoly, **Ragas and raginis**, Vol. 2., pl. LXV.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६५ : १-४, जुलै १९८६ – एप्रिल १९८७

स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीचे स्त्री–शिक्षणातील कार्य

वर्षा शिरगांवकर

रामनारायण रुईया कॉलेज, मुंबई

एकोणिसाव्या शतकामध्ये भारतातील समाज–सुधारकांनी स्त्री–शिक्षण हे आपल्या सुधारणेच्या उपक्रमातील महत्त्वाचे अंग मानले. स्त्री–शिक्षणाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील काही व्यक्तींनीही प्रयत्न केले होते. सुरुवातीच्या सुधारकांच्या लेखांमध्ये स्त्री–शिक्षण हा एका महत्त्वाचा चर्चेचा विषय होता असे आढळते. स्त्रियांना शिक्षण दिले जावे असे मत प्रथम प्रदर्शित करणारे महाराष्ट्रातील सुधारक बाळशास्त्री जांभेकर हे होते. 'पुनर्विवाहप्रकरण' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत विधवा–विवाहासारख्या विवाद्य विषयावर मत देताना त्यांनी स्त्रियांना शिक्षण दिले जावे अशी इच्छा व्यक्त केली. शिक्षण घेतल्याने स्त्रियांमध्ये चांगल्या प्रकारे मानसिक बदल घडून येईल यावर बाळशास्त्रींचा विश्वास होता. स्त्रियांना शिक्षण दिल्याने त्या आपल्या चालीरीती विसरतील या संदेहाला उत्तर म्हणून त्यांनी या प्रस्तावनेत असेही लक्षात आणून दिले की, तत्कालीन युरोपीय स्त्रिया शिक्षण घेऊनही आपापल्या रूढी पाळत होत्या.[१] बाळशास्त्री जांभेकर यांच्यानंतर आलेल्या सुधारकांनी स्त्री–शिक्षणासाठी प्रत्यक्ष पावले उचलण्यास सुरुवात केली.

मुंबईमध्ये स्त्री–शिक्षणाची सुरुवात बॉम्बे एज्युकेशन सोसायटीने स्थापलेल्या मुलींच्या शाळांनी झाली.[२] बॉम्बे एज्युकेशन सोसायटी इ. स. १८१५ मध्ये स्थापन झाली होती आणि तिचा उद्देश "युरोपीय मुलींना ख्रिश्चन धर्मातील तत्त्वांनुसार शिक्षण देणे" असा होता. परंतु इ. स. १८२० चा सोसायटीचा अहवाल असे दर्शवितो की, सोसायटीच्या ५ शाळांमधील ५४ मुलींपैकी काही मुली भारतीय होत्या.[३] याशिवाय मार्च १८२४ मध्ये अमेरिकन मिशनऱ्यांनी ज्यू मुलींसाठी मुंबईत एक शाळा सुरू केली, त्याचबरोबर पारशी आणि हिंदू मुलींसाठी एक इंग्लिश शाळा उघडली गेली.[४] परकीयांच्या या प्रयत्नांशिवाय इ. स. १८३० पासून काही भारतीयांकडूनही स्त्री–शिक्षणासंबंधी विचार प्रदर्शित केले गेले. इ. स. १८३७–१८३८ मध्ये रेव्ह. डॉ. विल्सन यांनी "स्त्री–शिक्षण" या विषयावर एक लेखमाला सुरू

केली होती. या विषयाला लोकांकडून प्रोत्साहन मिळावे यासाठी डॉ. स्मिटन यांनी याच विषयातील उत्कृष्ट लेखांना बक्षिसे देणे सुरू केले. पहिले उत्कृष्ट लेख हरी केशवजी आणि तिरुमल राव यांचे ठरले. या लेखांमध्ये मांडलेले स्त्री–शिक्षणासंबंधीचे विचार इतर लोकांपुढे यावे यासाठी डॉ. विल्सन यांनी संपादित केलेल्या 'ओरिएन्टल ख्रिश्चन स्पेक्टेटर' या मासिकात ते छापले गेले. मुलींना शिक्षण देण्यात यावे हा विचार लोकांना पटत आहे असे पाहून डॉ. विल्सन यांनी मुलींची शाळा काढण्याचे ठरविले. जगन्नाथ शंकरशेठ यांनी शाळेसाठी आपल्या बंगल्यातील काही जागा देण्याचे मान्य केले.[५]

अशा प्रकारच्या स्त्री–शिक्षणाच्या प्रयत्नांची पार्श्वभूमी स्टुडण्ट्स् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटीला लाभली होती. ६ जून १८४८ रोजी दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली एलफिन्स्टन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एक सभा भरविली. या सभेत केले गेलेले ठराव खालीलप्रमाणे होते :

१. वाङमय, शास्त्र आणि इतर विषय यावरील ज्ञान वाढविण्यासाठी आणि या विषयांवर आपले मत मांडण्यासाठी एलफिन्स्टन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची एक संघटना करण्यात यावी.

२. या संघटनेचे नाव "स्टुडण्ट्स् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी" असे निश्चित करण्यात यावे.

३. "नेटिव्ह लिटररी सोसायटी"च्या[६] सर्व सदस्यांना या नवीन सोसायटीचे सभासद म्हणून प्रवेश देण्यात यावा.

या प्रसंगी एलफिन्स्टन महाविद्यालयातील एक प्राध्यापक मि. रीड यांनी सोसायटीला नियमांची एक यादी सुपूर्द केली. हे नियम थोड्याफार फरकांनी सोसायटीमध्ये स्वीकारण्यात आले. कार्यवाही समिती आणि अधिकारी यांची निवडही यावेळी करण्यात आली. त्यानुसार प्रो. पॅटन यांची अध्यक्ष म्हणून, दादाभाई नौरोजी यांची खजिनदार म्हणून, तर रिचर्ड आणि रीड यांची सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली.[७]

वरील बैठकीनंतर १३ जून १८४८ रोजी स्टुडण्ट्स् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी साकार झाली. तेव्हा ६ जून १८४८ रोजी करण्यात आलेले ठराव पुन: पास केले गेले. सोसायटीच्या सभासदांनी आपल्यासमोर दोन ध्येये ठेवली होती–१. इंग्रजी वाङमय आणि शास्त्र यांमध्ये सोसायटीच्या सभासदांची प्रगती करणे व २. ज्ञानाच्या प्रसारासाठी शाळांची स्थापना करणे. अर्थात, स्त्री–शिक्षण हे सोसायटीचे उद्दिष्ट आहे यावर सोसायटीच्या सर्व सभासदांनी भर दिला. ज्ञान सर्व लोकांपर्यंत पोचावे यासाठी शाळांबरोबर मासिके सुरू करावी असे ठरले.[८] सोसायटीच्या कार्याला वाङ्मय, शास्त्र आणि सामाजिक विषयांवरील निबंध–वाचनाने सुरुवात झाली. एलफिन्स्टन संस्थेच्या प्रमुखांना आणि आजी व माजी

विद्यार्थ्यांनाच ही सोसायटी खुली करण्यात आली होती. जे विषय धार्मिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये वादविवाद निर्माण करणार नाहीत, केवळ अशा विषयांवरील निबंध आणि भाषणे यांनाच परवानगी देण्यात आली.

सोसायटीच्या स्थापनेनंतर तीन महिन्यांनी म्हणजेच सप्टें. १८४८ मध्ये दोन मातृभाषाविषयक शाखा स्थापन झाल्या–मराठी भाषा बोलणाऱ्या हिंदूंसाठी ' मराठी ज्ञान–प्रसारक सभा ' तसेच गुजराथी भाषेचा विकास करू इच्छिणाऱ्या पारशी लोकांसाठी ' गुजराथी ज्ञान-प्रसारक सभा. ' एल्फिन्स्टन संस्थेतील काही मराठी भाषिकांच्या प्रयत्नांमुळे १ सप्टेंबर १८४८ रोजी 'मराठी ज्ञान–प्रसारक मंडळी' सुरू करण्यात आली. या प्रसंगी नारायण विष्णु यांनी "भारतातील स्त्रियांची परिस्थिती" या विषयावर एक निबंध सादर केला. श्रोत्यांची संख्या ७५ होती. ५ सप्टेंबर १८४८ रोजी 'गुजराथी ज्ञानप्रसारक मंडळी'ची स्थापना झाली. असे दिसून येते की, मराठी ज्ञान–प्रसारक सभेला मिळालेल्या प्रतिसादापेक्षा गुजराथी ज्ञान–प्रसारक सभेला मिळालेला प्रतिसाद जास्त होता. २५ एप्रिल १८४९ पर्यंत गुजराथी ज्ञान–प्रसारक सभेच्या २१ सभा झाल्या. त्यांत ८ भाषणे झाली आणि १० निबंध वाचण्यात आले. या निबंधांपैकी बरजोरजी रुस्तुमजी यांचा निबंध उल्लेखनीय होता. निबंधाचा विषय होता " भारतातील स्त्रिया : त्यांची सांप्रतची स्थिती आणि शिक्षणाची आवश्यकता. " गुजराथी ज्ञान– प्रसारक सभेमध्ये श्रोत्यांची संख्या कमीत कमी १०० ते जास्तीत जास्त २०० अशी असे.[९]

मे १८४९ मध्ये पहिले अधिवेशन होईपर्यंत सोसायटीने एकूण ४६ विद्यार्थ्यांना भरती केले होते. तोपर्यंत २० सभा घेतल्या गेल्या. यांत एकूण ३५ निबंध वाचले आणि चर्चिले गेले. यांपैकी बरेच निबंध सामाजिक विषयांवर होते. स्थापनेपासून तीन वर्षांपर्यंत सोसायटीमध्ये स्त्री-शिक्षणावर ३ निबंध वाचण्यात आले. बैरामजी कर्सेटजी यांनी ऑगस्ट १८४९ मध्ये " स्त्री–शिक्षण भाग–२ " हा निबंध वाचला. या निबंधाला सोसायटीच्या सभासदांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळून तेथे उपस्थित असलेल्या प्रत्येक सभासदाने स्त्री–शिक्षणाच्या कार्याला वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली.[१०]

स्टुडण्ट्स् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटीचे तत्कालीन अध्यक्ष प्रो. पॅटन यांनी सप्टेंबर १८४९ मध्ये मुंबईतील लोकांनी स्त्री–शिक्षणासाठी सहकार्य करावे असे आवाहन करणारे एक परिपत्रक काढले. मुलींमध्ये नैतिक आणि मानसिक विकास घडवून आणणे हा मुलींची शाळा काढण्यामागील उद्देश आहे, असे या परिपत्रकाने स्पष्ट केले. शाळांमध्ये मुलींना त्यांच्या शिक्षकांकडून नीतिकथा सांगण्यात येणार होत्या. मुलींच्या पाठांमध्ये नेहमी पाहण्यात येणारे प्राणी, वृक्ष इत्यादींचा समावेश करण्यात येणार होता.[११] या परिपत्रकानुसार २१ ऑक्टोबर १८४९ रोजी मराठी हिंदू मुलींसाठी ३ आणि पारशी मुलींसाठी ४ शाळा सुरू

करण्यात आल्या. शाळांमधील मराठी मुलींची संख्या २४ तर पारशी मुलींची संख्या ४४ अशी होती. परंतु लगेचच मुलींच्या कमी संख्येमुळे क्रमांक २ आणि क्रमांक ३ च्या पारशी शाळा एकत्रित केल्या गेल्या.[१२] एलिफस्टन संस्थेच्या काही विद्वानांनी आणि प्राध्यापकांनी सहा ते आठ महिन्यांपर्यंत मुलींना शिकविण्यासाठी रोजचे २ ते ३ तास देणे सहज कबूल केले. शिकविण्यास येणाऱ्या स्वयंसेवकांना दिवसभर काम असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी मुलींच्या शाळांची वेळ सकाळी ७ ते १० अशी ठेवण्यात आली. त्यानंतर मात्र पाच महिन्यांनी मराठी हिंदू शाळांसाठी आणि नऊ महिन्यांनी पारशी शाळांसाठी पगारी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली.[१३] तेव्हापासून शाळांची वेळ रोज सकाळी ९ ते दुपारी ४ अशी ठेवण्यात आली. हळूहळू शाळेत येणाऱ्या मुलींच्या संख्येत भर पडली. नोव्हेंबर १८५० चा अहवाल असे दर्शवितो की, तेव्हा मराठी हिंदू शाळांमधील मुलींची संख्या १०५ तर पारशी मुलींची संख्या २०३ इतकी होती. अशा रीतीने सोसायटीने सुरू केलेल्या ६ शाळांमधील मुलींची संख्या एकूण ३०८ झाली. इ. स. १८५२ मध्ये सोसायटीच्या दोन शाखांनी सादर केलेल्या अहवालांवरून कोणकोणत्या ठिकाणी शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या याची माहिती मिळते. तीन मराठी हिंदू शाळा अनुक्रमे लोहार चाळ (शाळा क्र. १), गिरगाव रोड (शाळा क्र. २) आणि शिप ओळ (शाळा क्र. ३) येथे होत्या. पारशी मुलींच्या तीन शाळा फोर्ट विभाग (शाळा क्र. १), चंदनवाडी (शाळा क्र. २) आणि मिराझ स्ट्रीट (शाळा क्र. ३) येथे स्थापन झाल्या होत्या.[१४] 'बॉम्बे टाईम्स' आणि 'बॉम्बे टेलिग्राफ ॲण्ड कोरियर' या वृत्तपत्रांनी सोसायटीचा उद्देश आणि कार्य लोकांपर्यंत पोचविण्यात बरीच मदत केली.[१५]

एप्रिल १८५१ मध्ये बुद्धिवर्धक हिंदु सभा नावाची सोसायटीची आणखी एक शाखा अस्तित्वात आली. या शाखेच्या सभा फोर्ट विभागाच्या बाहेर भरविण्यात आल्या होत्या. यांत प्रामुख्याने गुजराथी लोक हजर होते. स्त्री-शिक्षण या विषयावर झालेल्या एका भाषणात गुजराथी मुलींसाठी शाळा सुरू केली जावी या मुद्द्यावर भर दिला गेला. हे भाषण लोकप्रिय होऊन त्याच्या १,५००० प्रती खपल्या. स्त्री-मुक्ती या विषयावर आणखी इतर लेखही या प्रसंगी वाचण्यात आले. या प्रयत्नांचे फळ म्हणून पायधुणी येथे १६ जून १८५१ रोजी एक शाळा सुरू करण्यात आली. गुजराथी वाणी जातीच्या मुलींना शिक्षण देणे हे या शाळेचे उद्दिष्ट होते. शाळेत जाणाऱ्या मुलींना तेथे नेमके काय शिकविले जाते हे जाणून घेण्यासाठी बऱ्याच वेळेला मोठ्या स्त्रियाही या शाळेत येऊन बसत असत ! हळूहळू वाणी जातीमधील स्त्री-शिक्षणाबद्दलचा पूर्वग्रह कमी होऊ लागला; याला कारण म्हणजे शाळेतील अभ्यासाची पद्धती आणि मुलींना सांगण्यात येत असलेल्या नीति-कथा.[१६] पायधुणीमधील शाळेला मिळालेला प्रतिसाद पाहून सोसायटीने

या जातीच्या मुलींसाठी आणखी एक शाळा सुरू करण्याचे ठरविले. मंगलदास नथूभाई यांनी शाळेच्या स्थापनेसाठी देणगी देण्याचे कबूल केल्यानंतर त्यांच्या सांगण्यावरून ही शाळा फोर्ट विभागात २ जुलै १८५४ रोजी सुरू करण्यात आली. परंतु या शाळेला मिळालेला प्रतिसाद इतर शाळांच्या मानाने कमी होता. २ एप्रिल १८५५ चा अहवाल असे दर्शवितो की, येथील मुलींची संख्या सर्वसाधारणपणे १५ च्या वर गेली नाही.[१७] अर्थात, येथील मुलींची संख्या कमी असली तरीही या शाळेच्या स्थापनेपूर्वीच सोसायटीने सुरू केलेल्या एकूण शाळांच्या विद्यार्थिनींच्या संख्येत वाढ झालेली दिसते. सप्टेंबर १८५२ मध्ये सोसायटीने स्थापन केलेल्या ७ शाळांमधील मुलींची संख्या ५४५ अशी होती,[१८] ज्यात मराठी मुलींची संख्या १२९, पारशी मुलींची सख्या ३७१ आणि गुजराथी मुलींची संख्या ४५ अशी होती.[१९]

मुलींच्या या शाळांमधील अभ्यासक्रम पाहणे या ठिकाणी आवश्यक ठरेल. शाळांची स्थापना होण्यापूर्वी पाठ्य–पुस्तकांचे स्वरूप कसे असावे याविषयी शिक्षकांनी अनेक वेळा सभा घेऊन चर्चा केली होती. इ. स. १८५० मध्ये एक पाठ्य–पुस्तक मराठी आणि गुजराथी ह्या दोन्ही भाषांमध्ये छापण्यात आले. अनेक वृत्तपत्रांनी या पुस्तकाचे स्वागत केले. ‘ ज्ञानोदया ’ने आपले मत व्यक्त करताना म्हटले, “ मुलींसाठी पुस्तके तयार करण्याचा पश्चिम भारतातील नागरिकांचा हा पहिला प्रयत्न होय.”[२०] या पुस्तकाचे नाव “मुलींचे पाठ्यपुस्तक” असे असावे.[२१] इ. स. १८५१ मध्ये या पुस्तकाची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध झाली. “ ज्ञानबोधक भाग पहिला ” असे या सुधारित आवृत्तीचे नाव होते. इ. स. १८५४–५५ पर्यंत ज्ञानबोधकाचा तिसरा भाग छापखान्यात पाठविण्याच्या दृष्टीने तयार झाला होता. त्याच वर्षी सोसायटीचे कार्य पाहून बोर्ड ऑफ एज्युकेशनने प्रत्येक भागाच्या १००० प्रती काढण्यासाठी फंड देण्याची व्यवस्था केली. इ. स. १८५३ मध्ये गुजराथी शाळांना लावलेल्या अभ्यासक्रमातील विषय याप्रमाणे होते— भूगोल, अंकगणित, शिवणकाम, विणकाम, चेम्बर्सकृत नीति–कथांचे गुजराथी भाषांतर, ज्ञानबोधक भाग २, पर्शिया आणि इंग्लंडमधील प्राण्यांचे सचित्र दर्शन घडविणाऱ्या वर्टी यांच्या पुस्तकावर आधारित असलेले आणि निसर्ग–इतिहासाची (नॅचरल हिस्ट्री) कल्पना देणारे एक पुस्तक, नीतिकथा आणि गाणी.[२२] अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेतल्या जात. कधी कधी तोंडी परीक्षेनंतर लगेच बक्षीससमारंभ होत असे ! तोंडी परीक्षेच्या वेळी शिक्षक मुलींना प्रश्न विचारत. ही प्रश्नोत्तरे बक्षीस–समारंभाच्या वेळी आलेल्या पाहुण्यांसमोर होत असत. कधी कधी उत्सुकता म्हणून प्रमुख पाहुणे मुलींना प्रश्न विचारत.[२३] बक्षीस–समारंभाच्या वेळी मुलींनी तयार केलेल्या विणकाम–शिवणकामाचे नमुने असलेले एक प्रदर्शनही भरविण्यात येत असे.[२४]

स्त्री–शिक्षणाच्या कार्यासाठी सोयी प्राप्त करून घेण्यात सोसायटी सुरुवातीपासून सुदैवी होती असे म्हणता येईल. सोसायटीशी संबंध नसतानाही जगन्नाथ शंकरशेट यांनी गिरगाव येथील पळसे वाडा या आपल्या घराचा एक भाग सोसायटीला मुलींच्या शिक्षणासाठी दिला. ग्रॅण्ट मेडिकल कॉलेजचे एक पदवीधर आणि सोसायटीचे सभासद डॉ. भाऊ दाजी लाड यांनी इ. स. १८५९ मध्ये सोसायटीच्या लोहार चाळीतील क्रमांक १ च्या मराठी–हिंदू शाळेला रु. ४० ची रक्कम मदत म्हणून दिली. त्यानंतरच्या तीन वर्षांमध्ये शाळांसाठी फंड जमा करण्याची मोहीम काढण्यात आली. या मोहिमेत रु. १६,५०० जमा झाले. "चार पारशी" यांनी[२५] दिलेल्या रु. ४,८०० च्या ठेवीमुळे सोसायटीच्या हिंदू आणि पारशी शाळांमध्ये पगारी शिक्षक नेमणे शक्य झाले. सर मंगलदास नथूभाई यांनी दरवर्षी रु. २०० अशी देणगी दिल्यामुळे फोर्ट येथे दुसरी गुजराथी हिंदू शाळा स्थापन होऊ शकली. इ. स. १८५८ च्या शेवटी त्यांनी पायधुणी आणि फोर्टमधील गुजराथी शाळांच्या मदतीसाठी दरवर्षी रु. १००० देण्याची इच्छा व्यक्त केली. या आर्थिक प्रयत्नांखेरीज आणखी इतर प्रकारची मदतही सोसायटीला मिळाली. एलिफन्स्टन संस्थेचे प्रो. गिराड यांच्या पत्नीने मुलींना पशुपक्ष्यांची माहिती व्हावी या दृष्टीने 'पिक्टोरिअल म्युझियम ऑफ ॲनिमेटेड नेचर ॲंड इलस्ट्रेशन्स ऑफ नॅचरल हिस्ट्री'चे दोन खंड सोसायटीला दिले. इ. स. १८६० नंतर सोसायटीला मिळालेल्या देणग्या इमारतींच्या स्वरूपात होत्या.

सोसायटीच्या शाळा प्राथमिक असल्याने तेथे इयत्ता चवथीपर्यंत मुलींना शिक्षण दिले जाई. शाळांमध्ये पुरुष शिक्षक असल्यामुळे इयत्ता चवथीनंतर मुलींना त्यांचे पालक शाळांमध्ये पाठवत नसत. म्हणूनच मराठी–हिंदु आणि गुजराथी शाळांमध्ये जाणाऱ्या मुली सर्वसाधारणपणे १० वर्षांच्या आतल्या असत. परंतु पारशी शाळांमध्ये काही मुली १५ व्या वर्षापर्यंत येत असल्याची उदाहरणे आहेत. इ. स. १८५२ मध्ये एक समस्या निर्माण झाली. प्रो. रीड उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाणार होते. त्याच सुमारास प्रो. पॅटन आजारी पडले. त्यामुळे काही काळपर्यंत शाळांमधील शिक्षकांच्या जागा रिकाम्या राहणार होत्या. या समस्येवर तोडगा म्हणून त्यावेळचे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष सर अर्स्काइन पेरी यांनी ऑक्टोबर १८५२ मध्ये स्त्रियांची एक कमिटी स्थापन केली.[२६] या कमिटीत युरोपीय स्त्रिया होत्या. शाळांमध्ये पुरुष शिक्षकांची कमतरता भासत असल्यामुळे कमिटीतील स्त्रिया मुलींना शिकविणार होत्या. परंतु या स्त्रिया शिकवू लागल्या तर शाळांमध्ये इंग्लिश चालीरीतींचा अंतर्भाव होईल आणि शाळेत जाणाऱ्या मुली त्या चालीरीती उचलतील असे भय काही गुजराथी मासिकांनी व्यक्त केल्यामुळे स्त्रियांची कमिटी पुढे येऊ शकली नाही.

शाळेत येऊ न शकणाऱ्या मुलींमध्ये ज्ञानप्रसार व्हावा यासाठी सोसायटीने

एक मासिक सुरू करण्याचे ठरविले. मराठी आणि गुजराथी अशा दोन्ही भाषांमध्ये ते असावे असेही ठरविण्यात आले. मराठी मुलीचे मासिक तयार करण्यासाठी एक कमिटी स्थापण्यात आली. या कमिटीत मासिकाच्या स्वरूपाबद्दल चर्चा करण्यात आली.[२७] ही चर्चा फलद्रूप होऊन "सुमित्रा"[२८] नामाचे मासिक सुरू करण्यात आले. इ. स. १८५६ मध्ये रामकृष्ण गोपाळ भांडारकर मराठी ज्ञानप्रसारक सभेचे सेक्रेटरी असताना या मासिकामध्ये बरीच प्रगती घडून आली. त्याच वर्षी गुजराथी मासिकाने एकूण २०० प्रती छापण्याचा मान मिळविला.[२९] मुलींना आवडणाऱ्या आणि उपयुक्त ठरणाऱ्या विषयांचा अंतर्भाव मासिकाध्ये करण्यात आला होता.

एकंदरीत पाहता इ. स. १८५६ पर्यंत सोसायटीचे कार्य बरेच जोमाने चालून सोसायटी आपली उद्दिष्टे पूर्ण करण्यात यशस्वी झाली होती. या वर्षापर्यंत सोसायटीच्या एकूण १६ शाळांपैकी ९ मुलींच्या शाळा होत्या.[३०] ठाणे येथे शाळा सुरू करण्याचा सोसायटीचा प्रयत्न विद्यार्थिनींच्या कमी संख्येमुळे अयशस्वी झाला.[३१] परंतु पुणे, धारवाड, बेळगाव, रत्नागिरी, सोलापूर आणि अहमदाबाद येथे मुलींच्या शाळा सुरू करण्यासाठी सोसायटीने बराच पुढाकार घेतला. या कामी सोसायटीला यश प्राप्त झाले.[३२]

या सर्व शाळांचे स्वरूप प्रामुख्याने प्राथमिक होते. परंतु इ.स. १८६४ पासून न्यायमूर्ती तेलंग यांच्या प्रयत्नांमुळे माध्यमिक शाळांची सुरुवात झाली. माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी शिकविण्याची सोय करण्यात आली होती.

■ ■

संदर्भ व टीपा

१. जी. जी. जांभेकर (संपा.), **मेमाआर्स अँण्ड रार्यटिंज ऑफ आचार्य बाळशास्त्री जांभेकर.** खंड २, पान क्र. २९३–२९५. हे पुस्तक बाळशास्त्री जांभेकर यांनी गंगाधरशास्त्री फडके यांच्याकडून लिहवून घेतले असावे. पहा, प्रभाकर पाध्ये आणि श्री. रा. टिकेकर, **आजकालचा महाराष्ट्र**, पान क्र. ७८.

२. एस. आर. शिरगांवकर," दि. एज्युकेशन ऑफ गर्ल्स इन महाराष्ट्र," **प्रोसिडिंग्ज ऑफ मराठा हिस्ट्री सेमिनार**, कोल्हापूर, १९७०, पान क्र. ३५१–३६३.

३. पुढे पहा.

४. पुढे पहा.

५. पु. बा. कुलकर्णी, **ना. नाना शंकरशेट यांचे चरित्र**, पान क्र. ६६–६७.

६. स्टुडण्ट्स् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटीच्या पूर्वी नेटिव्ह लिटररी सोसायटी नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली होती. ही संस्था म्हणजे काही मंडळींनी चर्चा करण्यासाठी सुरू केलेला गट होता. एल्फिन्स्टन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी एकत्र येऊन ही सोसायटी स्थापन केली होती. परंतु विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यास ही सोसायटी असमर्थ ठरल्याने ती बरखास्त करून त्याऐवजी स्टुडण्ट्स् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी सुरू करण्यात आली. पहा, **प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी**, वर्षे १८५४–५६ पान क्र. १–९.

७. **दि टेलिग्राफ ॲण्ड कोरियर**, खंड २, क्रमांक १४०, १२ जून १८४८, पान क्र. ५५९.

८. **प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी**, वर्षे १८६२–६३, अँपेण्डिक्स डी (रूल्स ॲण्ड रेग्युलेशन्स ऑफ स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी), पान क्र. ५०.

९. **दि टेलिग्राफ ॲण्ड कोरियर**, खंड ३, क्रमांक २४३, १० ऑक्टोबर १८४९, पान क्र. ९७१.

१०. **प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायन्बिफिक सोसायटी**, वर्षे १८५४–५५ आणि १८५५–५६, पान क्र. १–९. आणखी पहा, **स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी (१८४८-४९ ते १९४७-४८)**, पान क्र. ५, सोसायटीमध्ये झालेल्या भाषणांच्या आणि वाचण्यात आलेल्या निबंधांच्या यादीसाठी पहा, ॲपेन्डिक्स जे (ए), पान. क्र. ४२ आणि पुढे.

११. **प्रोसिडिंग्ज ऑफ दि. स्टुडण्ट्टस् लिटररी ॲड सायण्टिफिक सोसायटी**, वर्षे १८५४–५५ आणि १८५५–५६, पान क्र. ९–१०.

१२. पुढे पहा.

१३. सोसायटीत येऊन शिकविणाऱ्या स्वयंसेवकांच्या नावांसाठी पुढे पहा, तळटीप. आणखी पहा, **स्टूण्डटस् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी** (१८४८–४९ ते १९४७–४८), अँपेण्डिक्स एच, पान क्र. ३९–४०.

१४. **दि. टेलिग्राफ अँड कोरियर**, खंड ६, क्रमांक ४२, १८ फेब्रुवारी १८५२, पान क्र. १७२.

१५. **दि टेलिग्राफ ॲण्ड कोरियर**, खंड ३, क्र. २२५, १९ सप्टेंबर १८४९, पृ. ८९९.

१६. प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडंटस् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी वर्षे, १८५४–५५ आणि १८५५–५६, पान क्र. १३–१४.
१७. पुढे पहा.
१८. दि. टेलिग्राफ अॅण्ड कोरियर, खंड ६, क्रमांक २२७, २० सप्टेंबर १८५२, पान क्र. ९२१.
१९. पु. बा. कुलकर्णी, उ. ग्रं., पान क्र. ७५.
२०. ज्ञानोदय, १५ ऑक्टोबर १८५०, प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी, वर्षे १८५४–५५ आणि १८५५–५६ मध्ये उद्‌धृत, पान क्र. ११.
२१. पुढे पहा.
२२. प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी, वर्षे १८५३–५६, पान क्र. १०.
२३. दि टेलिग्राफ अॅण्ड कोरियर, खंड ६, क्रमांक ४४, फेब्रुवारी १८५२ पान क्र. १७४–१७५.
२४. पुढे पहा.
२५. प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी, वर्षे १८४४–५५ आणि १८५५–५६, पान क्र. १२. "चार पारशी" यांच्या नावाचा येथे उल्लेख केलेला नाही.
२६. कमिटीतील स्त्रियांच्या नावासाठी पहा, दि टेलिग्राफ अॅण्ड कोरियर, खंड ६, क्रमांक २२७, २० सप्टेंबर १८५२, पान क्र. ९२१.
२७. प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी अॅड सायन्टिफिक सोसायटी वर्षे १८५४–५५ आणि १८५५–५६, पान क्र. ३१–३२
२८. प्रोसिडिंग्ज ऑफ दि स्टुडण्टस् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी, वर्षे १८५६–५७, १८५७–५८ आणि १८५८–५९, पान क्र. १२.
२९. पुढे पहा.
३०. जे. मॅसेलॉस, टोवर्डस् नॅशनॅलिझम, पान क्र. २९–३०.
३१. स्टुडण्टस् लिटररी अॅण्ड सायन्टिफिक सोसायटी (१८४८–४९ ते १९४७–४८), पान क्र. ९.
३२. जे. मॅसेलॉस, उ. ग्रं., पान क्र. ३०

Summary

The Students' Literary and Scientific Society of Bombay and its work in female education

The pioneering work of undertaking female education in Bombay was done by the Bombay Education Society, which was established in 1815. Since then there were some other efforts in this direction. The Students' Literary and Scientific Society was founded in Bombay on 6th June 1848 under the chairmanship of Dadabhai Naoroji· Within three months of its foundation, the Marathi and Gujarati branches of the Society were opened for the benefit of the respective communities. The cause of female edncation was promoted in various ways by the Society and its branches : papers were presented on the subject., special school textbooks for females were prepared., female schools were opened., a journal entitled 'Sumitra' was founded. By 1856, out of 16 schools of the Society in Bombay, 9 were for girls. The Society also took efforts to open female schools in places tike Pune, Dharwad, Belgaum, Ratnagiri, Sholapur and Ahmeda-bad. They were mostly primary schools. It was from the year 1864, under the leadership of Justice Telang that middle schools for girls were opened, where the provision of tea-cting the English language was also made.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६५ : १–४, जुलै १९८६–एप्रिल १९८७

टिपणे

१. सामाजिक इतिहास व चंपूकाव्य

संस्कृत साहित्यात गद्य व पद्यमिश्रित वाङ्मयाचा एक प्रकार आहे. त्याला चंपूकाव्य अशी संज्ञा आहे. चंपूकाव्याबद्दल बऱ्याच व्याख्या विद्वान करतात, परंतु गद्य व पद्यमिश्रित काव्य म्हणजे चंपूकाव्य होय. एवढी साधी सुटसुटीत चंपूबद्दलची व्याख्या, 'सामाजिक इतिहास व चंपूकाव्य' या विषयाला पुरे आहे.

"The Champus have neither sincwy strength and efficiency of real prose nor the weight and power of real poetry, but the Chamupu, written as a rule, has no original voice of its own" असे एस्. एन्. दासगुप्ता म्हणत असतील. परंतु चंपूकाव्यात भक्ति, शौर्य,/सामाजिक व राजकीय विचारांचा पगडा आढळत नाही असे कोण म्हणेल ?

संस्कृत चंपूसाहित्यात रामायण, महाभारत, भागवत, शिवपुराण, नृसिहपुराण, मार्कंडेयपुराण, स्कन्दपुराण, जैनपुराण हीं पुराणातील कथांवर आधारित चंपूकाव्यें तर आहेतच, शिवाय शंकराचार्य, वेदान्ताचार्य, रामानुजाचार्य अणि शैव व वैष्णव तसेच जैनाचार्यांच्या चरित्रांवरदेखील चंपूकाव्ये भरपूर आहेत. खेरीज ऐतिहासिक व्यक्तींवरही चंपूकाव्ये आहेत.

विविध प्रकारच्या संस्कृत साहित्याचा इतिहास तसेच संस्कृत पुस्तकांची सूची चाळल्यास, सामाजिक, दार्शनिक, राजकीय, भक्तीपर तसेच संतांवर, देवता उत्सवांवर, तीर्थक्षेत्रांवर आणि इतर अनेक अवांतर विषयांवर आधारलेली चंपूकाव्याची नावे आढळतात. त्यात काही प्रकाशित झालेली आहेत तर काही पोथ्यांच्या स्वरूपात पडून आहेत. जाणकार संशोधक विद्वान संस्कृत पंडितांच्या मते ज्ञात झालेली चंपूकाव्यांची संख्या अडीचशेपर्यंत जाईल. त्यातील काही थोडी उत्तर भारतात लिहिली गेली आहेत. बाकीची जवळजवळ दोनशेच्यावर चंपूकाव्ये दक्षिण भारतात लिहिली गेली आहेत. विजयनगर, तंजावर, त्रावणकोर, कांची, श्रीरंग मीनाक्षी मंदिर, विरूपाक्ष मंदिर वगैरे ठिकाणी पुष्कळ चंपूकाव्ये लिहिली गेल्याचे दिसेल. उत्तर भारतातील चंपूकाव्याचा विचार केल्यास रेवा, काशी, उज्जैन नरेशांचा संस्कृत पंडितांना राजाश्रय होता असे अनुमान करण्यास

जागा आहे. प्रस्तुत लेखात फक्त सामाजिक, ऐतिहासिक चंपूकाव्यांबद्दल चर्चा केलेली आहे. त्यात खालील चंपूकाव्यांचा अंतर्भाव आहे :

(१) नलचम्पू	(७) वरदाम्बिकापरिणयचंपू
(२) यशस्तिलकचम्पू	(८) नृसिंहचंपू
(३) वीरभद्रचंपू	(९) यतिराजविजयचंपू
(४) विरूपाक्षवसंतोत्सवचंपू	(१०) धर्मविजयचंपू
(५) विश्वगुणादर्शचंपू	(११) भोसलवंशावळी
(६) आनंदरंगचंपू	(१२) शाहराजसभासरोवर्णिनी

कृष्णराज वडियरसंबंधी आठ चंपूकाव्ये, म्हैसूर वर्णनासंबंधी दोन चंपूकाव्ये उपलब्ध आहेत.

१. **नलचंपू**चा लेखक त्रिविक्रमभट होय. हा थोर गणिती, ‘ सिद्धांतशिरोमणी ’ कर्ता भास्कराचार्य याचा पूर्वज होय. नाशिक ताम्रपट तथा पाटण येथील पाटणादेवीच्या मंदिरालगतच्या चांगदेव मठातील शिलालेखावरून हा शांडिल्यगोत्री त्रिविक्रमभट होय असे डॉ दाजीनी सिद्ध केले आहे. याच शांडिल्यगोत्री त्रिविक्रमभटाने ‘ नलचंपू ’ काव्य लिहिले आहे. शांडिल्य-गोत्री त्रिविक्रमाचा संबंध मलखेडच्या राष्ट्रकूट घराण्यातील कृष्ण दुसरा व इंद्र तिसरा यांच्या दरबारांशी होता. इंद्र तिसरा याच्या कुरुंदवाड येथील राज्याभिषेकाच्या वेळी जे दान दिले गेले त्या दानपत्राचा मायना त्रिविक्रमभटाने लिहिला. इरोणी ताम्रपटात त्रिविक्रमभटाचा उल्लेख आढळतो.

भास्कराचार्य याचा ज्ञात पूर्वज त्रिविक्रमभट होय असे सिद्ध केले असले तरी ‘ नलचंपू ’त माझे वडील देवादित्य व आजे श्रीधराचार्य होत असे तो म्हणतो. यावरून भास्कराचार्यांचे ज्ञात पूर्वज त्रिविक्रम नसून श्रीधराचार्य होत असे ‘ नलचंपू ’त त्रिविक्रमभट नमूद करतो. हेच श्रीधराचार्य स्वविर-चित पाट्यागणितस्य सारमुद्धृत्य लोकव्यवहाराय प्रवक्ष्यति श्रीधराचार्यः हेच त्रिशतिकेचे लेखक होत, असे नलचंपूवरून सिद्ध करता आले आहे. तसेच ‘ मदन मदनिवासा वासरः प्राविण्येण्यः ’ या ‘नलचंपू’तील श्लोकावरून त्रिविक्रम तथा श्रीधराचार्य हे गोदा व मांजरा या संगमावरील बासरचे होत असे सिद्ध होते.

२. **यशस्तिलकचंपू**– सोमदेव या जैन कवीने धारवाड परिसरात हे चंपूकाव्य लिहिले आहे. हा राष्ट्रकूट घराण्यातील मलखेडचा कृष्ण तिसरा (इ. ९३९–९७०) याच्या कालात होऊन गेला. त्याच्या या काव्याबद्दल लिहावयाचे झाल्यास लेखकाने सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, वाङ्मय-यीन, तत्त्वज्ञानविषयक महत्त्वाचे विचार मांडले आहेत व त्यांवर चर्चा केली

आहे. याबद्दल हंडिकी काय म्हणतात ते उद्धृत केल्यास 'यशस्तिलकचंपू' कोणत्या योग्यतेचे आहे ते समजेल: "Yashaslilaka was composed in 959 A. D. somewhere in the area corresponding to modern Dharwar. It is a Jain religious romance written in Sanskrit prose and verse, but more important as encyclopedic record of literary, socio-political, religious and philosophical data valuable for the cullural history of India particularlly of the Deccan."

३. **विश्वगुणादर्शकचंपू** – 'विश्वगुणादर्शचंपू' काव्य व्यंकटाध्वरीने इ. स. १६३७ मध्ये पूर्ण केले. त्यात कवीने सूर्यवर्णन, भूलोकवर्णन, बदरिकाश्रमवर्णन, अयोध्यावर्णन, गंगानदीवर्णन, काशीवर्णन, समुद्रवर्णन, जगन्नाथवर्णन, गुर्जरदेशवर्णन, महाराष्ट्रवर्णन, आंध्रवर्णन, कर्नाटकवर्णन, रामानुजवर्णन, वेदान्तदेशिकाचार्यवर्णन, वैय्याकरणवर्णन, वैदिकवर्णन, ज्योतिष इत्यादी ४६ विषयांवर आपली लेखणी चालविली आहे व त्या संदर्भात लोकांच्या दोषांवर व गुणांवर मार्मिक टीका कवीने केलेली आढळते. ही टीका आजही पटण्यासारखी आहे. आज प्रत्येक वर्तमानपत्र घ्या, मासिक घ्या वा पंचांग घ्या, त्यात भविष्याचे निदान एक पान असतेच. ज्योतिष्याबद्दल कवि म्हणतो–

विलिखति सदसद्वा जन्मपत्रं जनानाम
फलति यदि तदानीं दर्शयत्यात्मदाक्ष्यम् ।
न फलति यदिलग्नं द्रष्टुरेवाह मोहं
हरति धनमि हैवं हन्त ! दैवज्ञपाशः ॥

ज्योतिषीवर्ग जन्मपत्रिका तयार करतो. जर अनुकूल फल मिळाले तर ज्योतिषी आपल्या ज्योतिष्यज्ञानाची स्तुती करून घेतो. जर अनुकूल फल मिळाले नाही तर जन्मलग्न चुकीचे असावे अशी थाप ठोकून देतो. दुःखाची गोष्ट अशी की हे भविष्यकार म्हणजे समाजाला लागलेला गळ होय. नेमके आजही हे ज्योतिषी समाजाला लुटतात. तसेच त्यांच्यामुळे समाज दुर्बल बनत चालला आहे. मराठे पानिपतच्या युद्धाला निघाले ते चांगल्या मुहूर्तावरच निघाले होते ना ? मग त्यांची दाणादाण का व्हावी ? आता सर्वसंगपरित्याग करून राष्ट्राला, समाजाला व माणसांना मार्गदर्शन करणाऱ्या संन्याशांची स्थिती कशी होती ती पहा. तो काळ म्हणजे इ. स. १६३७ चा काळ म्हणजे साडेतीनशे वर्षापूर्वीचा काळ. त्या काळात जे घडत होते तोच प्रकार आजही दृष्टीस पडतो.

"वाहनस्थं यतीं दृष्ट्वा सचैलं स्नानमाचरेत" असे स्मृतीचे वचन असताना देखील मठाधिपती संन्याशी खुशाल मेण्यातून हिंडत असत. त्यावर

टीका करताना चंपूकार म्हणतो:

गायत्रीं सहसा जहद्भगवतीं यज्ञोपवीतं त्यजन
मुंचन किंच शिखां विरक्तइवयः संप्राप्त तुर्याश्रमः।
आरूढश्चतुरन्तयानमभयो हा हन्त देशांतरे
ष्वर्थानामुपसंग्रहाय विचरत्येषोऽपि जनानां गुरुः ॥ १७८ ॥

कवि पुढे आणखी म्हणतो :

यस्य क्वाऽपि विलोकने सवसनं स्नानं बुधैः स्मर्यते।
यस्यान्नग्रहणे च निष्कृति तया चान्द्रायणं चोदितम।
तस्य प्रत्युत वाहनस्थित यतेर्दृष्टिर्विमुक्तिप्रदा
तस्यान्नं च समस्त पाप हृदि प्रत्येति विद्वानपि ॥ १७९ ॥

(विश्वगुणादर्शचम्पू, श्लोक १७८, १७९)

कवीने समाजातील या दुष्ट चालीवर नेमके बोट ठेविले आहे. आजही कित्येक मठाधिपती असेच दृष्टीस पडतात व लोकही त्यांचे मेण्यातील वा मोटारातील दर्शन घेणे धन्य मानतात. त्यांच्या प्रीत्यर्थ दिलेले अन्न सेवन करून आपणास धन्य समजतात. ज्याना संस्कृताचे सामान्य ज्ञान आहे त्यानी 'विश्वगुणादर्शचम्पू' मूळातून वाचले तर समाजाला कोणती कीड लागली होती ते समजून येते. तसेच सर्व वाचणे जमले नाही तरी निदान गुर्जरदेशवर्णन, २ आंध्रदेशवर्णन, ३ महाराष्ट्रदेशवर्णन, ४ कर्नाटकदेशवर्णन ही प्रकरणे समाजाची कळकळ ज्याना आहे त्यानी अवश्य वाचावी.

४. **वीरभद्रचंपू :** हे चम्पूकाव्य इ. स. १५७७ साली पद्मनाभ मिश्र याने पूर्ण केले.

पद्मनाभ मिश्र याचा संबंध रेवानरेशचा राजपंडित म्हणून होता. रेवा नरेशाचा दिल्लीच्या मोगल बादशहाशी घनिष्ट संबंध होता. रामचंद्रदेवाचा अकबराशी व रामचंद्रदेवाचा पिता वीरभानूचा हुमायूनशी व वीरभानूचा पिता शालिवाहनचा बाबरशी संबंध होता. रामचंद्रदेवाला मुलगा झाला त्याचे नाव वीरभद्र होते. वीरभद्र जन्मल्यानंतर अकबराने रेवानरेश रामचंद्रदेवाकडे भेट म्हणून मिठाई पाठविली. त्या संदर्भात रामचंद्राने आपल्या पदरी असलेला जगप्रसिद्ध गायक तानसेन याला इ. १५७७ मध्ये अकबराकडे पाठविले (संस्कृत प्रकाशित व अप्रकाशित काव्य, त्रिपाठी, पान १७२)

५. **विरूपाक्षवसन्तोत्सवचंपू** (Edited by R. S. Panchamukhi, pub. Chaukhamba, Vasanasi). याचा कर्ता अहोबलसूरि याने 'यतिराजविजयचम्पू', तथा 'विरूपाक्षवसंतोत्सवचम्पू' ही काव्ये अनुक्रमे इ. स. १३५० च्या व इ. स. १३८० च्या सुमारास लिहिली. हा वेदान्तदेशिकाचार्य

याचा शिष्य व माधवाचार्य विद्यारण्य याचा समकालीन. हा पामुडी–पट्टणच्या मंडळेश्वराचा आश्रित. पामुडी गाव आज बेंगलूर व गुंटकल यांच्यामध्ये आहे व ते पामुडी स्टेशन म्हणून ओळखले जाते. विजयनगर येथील विरूपाक्षाचा नऊ दिवस उत्सव साजरा कसा होत असे याचे वर्णन अहोबलसूरीने " विरूपाक्षवसन्तोत्सव " या चम्पूकाव्यात केले आहे. " Though the name of Vidyaranya has been associated with the foundation of Vjayanagar, there is no authentic record to prove, " असे डॉ. पी. बी. देसाई, डॉ. रित्ती, तसेच डॉ. गोपाळ आपल्या *History of Karnatak* मध्ये नमूद करत असले तरी विद्यारण्यसमकालीन कवि अहोबलसूरि आपल्या 'विरूपाक्षचंपू'त स्पष्टपणे 'विद्यारण्ययतींद्रनिर्मितपुर श्रीचक्रवर्तिनृपः ' जसे नमूद करतो हे ऑथेंटिक प्रूफ नव्हे काय ? यासंबंधीचा श्लोक असा आहे :

तत्रत्यास्तमपृच्छदेवमवनी देवोत्तमत्वं कवे
भूपालान खिलानिहागतवतो जानासि कोऽयं वद ।
सोऽयं प्रत्यवदत् स एष खलु तद्राजान्व वायोद्भवो
विद्यारण्ययतींद्रनिर्मितपुर श्रीचक्रवर्ती नृपः ॥

दुसरे असे की विद्यारण्यानी, एकेकाळी अस्तित्वात असलेल्या व पुढे तुघलकांच्या हल्ल्याने उद्ध्वस्त झालेल्या विजयनगरच्या जागेवरच ("निर्माय विद्यानगरं नृपं हरिहर:भिधम ") हरिहराकडून आपले गुरु विद्याशंकर तीर्थ यांच्या नावावर " विद्यानगर " वसविले म्हणून ' विरूपाक्षवसंतोत्सवचंपू 'त विद्यानगरचा उल्लेख खालीलप्रमाणे चार वेळा आला आहे :

१. " महाभेरिका निनादेन विद्यानगर कमलापुरादि लोकानामात्मेशरथोत्सवः समारब्ध इति अवबोधयत्—
२. ....श्रीविद्यानगरीमगात्
३. राजाधिराज विद्यानगरनरेश....
४. केचित्तु किष्किंधाचलबिलान्तस्थित रंगनाथ रथोत्सव दिदृक्षया विद्यानगरमगमन

(वि. व. चं., ११०)

पहिल्या प्रथम विजयनगर–नंतर विद्यानगर मदुराविज, नंतर विजयनगर म्हणून प्रसिद्ध झाले. ' विरूपाक्षवसंतोत्सवचम्पूचा 'चा हा उपयोग.

६. आनंदरंगचंपू : हे चंपूकाव्य माझ्या वाचण्यात नाही. त्याचा सारांश वाचण्यात आला आहे, म्हणून इतिहासावर मी जास्त प्रकाश टाकू शकत नाही. आनंदरंग पिल्ले हा पाँडिचरी येथील फ्रेंच सरदार डुप्ले याच्या हाताखालचा एक मोठा एतद्देशीय अधिकारी होता. त्याच्या चार रोजनिशी असून त्या

प्रकाशित झाल्या आहेत. त्यावरून श्रीनिवास कवीने आनंदरंग पिल्ले याचे सक्षिप्त जीवनचरित्र देऊन डुप्लेशी त्या काळच्या कोणकोणत्या राजांचा संबंध आला होता हे संक्षिप्तपणे दाखविले आहे.

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात 'धर्मविजय,' 'भोसलवंशावली-चम्पू,' 'शहाराजसभासरोवर्णिनी' हे ग्रंथ उपलब्ध आहेत. 'धर्मविजया'चा कर्ता नल्ला दीक्षित असून, त्यात शाहराजाला अधुनिक भोज समजून त्याचे वर्णन केलेले आढळते. तंजावरच्या शहाजीराजाचा काळ इ. १६८४–१७११ असा आहे.

'भोसलवंशावली'त भोसले वंशाचे वर्णन व सरफोजी (१७११–१७२९) याच्या कारकीर्दीचे व त्याचे गुणगान आढळते.

म्हैसूरच्या कृष्णराजसंबंधी आठ चम्पू आहेत, व म्हैसूरविषयी दोन चम्पूकाव्य आहेत. त्यांची सूची 'मानसगंगा'मध्यें आढळते.

७. **वरदांबिकापरिणयचंपू:** : हे चंपूकाव्य विजयनगर सम्राट अच्युतरायाच्या राणीने लिहिले आहे. या चंपूकाव्यात अच्युतराय याचा पराक्रम दृष्टीस पडत नाही. परंतु तिच्या सासऱ्याचे, वीर नरसिंहाच्या स्वारीचे व जयाचे वर्णन मिळते. विजयनगरबद्दल लिहिताना विद्यापूर असा त्यात उल्लेख केल्याचे आढळेल. हे काव्य तिने १५४१ साली लिहिले आहे.

८. **नृसिंहचंपू** : काव्याचा लेखक सूर्यदैवज्ञ असून त्याने एका ठिकाणी भास्कराचार्या (गणिती) बद्दल चांगले उद्‌गार काढिले नाहीत. उलट "भास्कराचार्येण (श्रीधरस्य) तस्करवत् अपहृत:" असे उद्‌गार काढिले आहेत. या सूर्यदैवज्ञाने आपल्या घराण्यातील आद्य 'लीलावती' टीकाकार नृसिंह दैवज्ञावर चंपूकाव्य न लिहिता आपले कुलदैवत नृसिंहावर चंपूकाव्य लिहिले आहे. त्यात तो आपल्या घराण्यातील तीन पूर्वजाची नोंद घेतो :

> आसीदस्त समस्तदोषनिवहं गोदो विदर्भायुतेः ।
> क्रोशेनोत्तरतस्तदुत्तरतटे पार्थाभिधानं पुरम् ॥१॥
> तत्रासीद गणकाग्रणी बुधवर: श्रीनागनाथो द्विजः
> भारद्वाज कुलेऽथ तस्यतनय: श्रीज्ञानराजाभिधः ॥ २ ॥
> यद्‌ग्रंथान समधीत्य शिष्यनिवहोऽप्याचार्य चर्या मगात् ।
> तत्सूनुर्गणितार्णवप्रतरणे सत् कर्णधार: सुधीः ॥ ३ ॥
> सगितागमकाव्यनाटकपटु: सूर्याभिधान: कविः ।
> चम्पूकाव्यमिदं चकार चतुरं लक्ष्मीपति प्रीतये ॥ ४ ॥

अशा रीतीने सूर्यदैवज्ञाने आपल्या पित्याचा व आपल्या आजाचा उल्लेख केला आहे. सांगण्याचा उद्देश एवढाच की सगर, जिल्हा गुलबर्गा येथील शांडिल्य गोत्री 'लीलावती' टीकाकार गंगाधर चंद्रभट याचे वंशज अद्याप सगर तथा सुरपूर

(जि. गुलवर्गा) परिसरात आहेत. आजही त्यांच्यापैकी काहींचा व्यवसाय पंचांगकर्त्यांचा असून " सुरपूर पंचांग " त्या भागात प्रसिद्ध आहे.

९. **यतिराजविजयचंपू** (१०१७–११२७) : ' रामानुजचंपू ' हे त्याचे दुसरे नाव होय. हे विशिष्टाद्वैती होत. यांची परंपरा अशी आहे की नारायण याने लक्ष्मीस उपदेश दिला. तिने विष्वकसेनाला, विष्वकसेनाने शठकोपस्वामीला व शठकोप स्वामीने नाथमुनीला, नाथमुनीने पुण्डरीक मुनीला, पुण्डरीक मुनीने राममिश्र स्वामीला, राममिश्रस्वामीने यमुनाचार्य यांना उपदेश केला. हे यमुनाचार्य रामानुजाचे परम गुरू होत. रामानुजाचा काळ इ. १०१७–११२७ असा होता. रामानुजपरंपरेतील पुंडरीक मुनी होत. त्यांचे जीवन पंढरपूरमधील पुण्डलिकासारखे आहे. पहिल्या प्रथम स्त्रीलंपट, पण पुढे एका मुनीच्या उपदेशाने मातृपितृभक्त बनले. यावरून दोघे एकच असावेत का ? रामानुज पुण्डरीकाचा काळ हा उत्तर राष्ट्रकूट काळ होय. भक्ति ही दक्षिणेतून वर महाराष्ट्रात आली अशी समजूत आहे. पंढरपूरचा पुण्डलीक हा तोच का ? तो दक्षिणेतून आला असावा काय याबद्दल संशोधन हवे. कदाचित माझी शंका अस्थानी असेल.

गो. प्र. जोशी
गुलबर्गा

■ ■

Summary

Same Champu Kavyas and social history

This note gives information about some of the Sanskrit Champu Kavyas in the ancient, medieval and modern periods of Indian history in the light of their relevance to the social history of India.

■ ■ ■

२. इंग्रज पलटणीचा तैनात खर्च (१७९२--९३)

पेशव्यांच्या नोकरीतील बॉइड (Boyd) ह्या इंग्रज (अमेरिकन) अधिकाऱ्याच्या एका पलटणीच्या खर्चाच्या संदर्भातील एक अप्रकाशित कागद

[प्रस्तुत कागद भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दफ्तरखान्यापैकी चंद्रचूड दफ्तरातील आहे. त्यावर २०४५९ असा मंडळाचा नोंदणी क्रमांक आहे. कागद दोन तीन ठिकाणी फाटला आहे. हे टिपण अपूर्ण आहे, पण आहे त्यातसुद्धा

महत्त्वाची व नवीन वाटेल अशी माहिती आहे, हे वाचल्यानंतर सहज ध्यानी येंण्यासारखे आहे.]

सु॥ सलास तिसैन मया व अलफ — श. ज्येष्ठ १७१४–वैशाख १७१५, स. मे-जून १७९२-मे-जून १७९३

यादी पलटण नि॥ पाईटसाहेब इंग्रेज सु॥ सलास तिसैन मया व अलफ येका पलटणाचा आकार ——— रु॥ये १०५११ पलटणाकडील आकार लोकांचा

	आा	दर आसामीस तैनात	यकूण दरमाहा रुपाये
ईग्रेज			
खासा सरदार	१	२०००	२०००
कपतान	१	३००	३००
लिफटण	५	१५०	७५०
सर्ज्यान मेजर	१	६५	६५
सर्ज्यन	९	६५	५८५
	१७		३७००
काले			
कमोदन	१	६०	६०
सुभेदार	१०	४०	४००
जमातदार	१०	२०	२००
हवालदार	४०	१२	४८०
नाईक	४०	८	३२०
तंबुरची	१०	८	८०
बासरीवाले	१०	८	८०
सिपाई ८४१	८४१	६	५०४६
कारकून	२	३०	६०
जासूद हलकारे	५	५	२५
मशालची	५	४	२०
भिस्ति	१०	४	४०
	९८४		६८११
तेरीज	१७		३७००
	१००१		१०५११

२१०० तोफखान्या (फाटले आहे)

(या पुढील कागदाचा भाग गहाळ झाला आहे)

(यादीच्या मागील बाजुवरील मजकूर पुढे दिला आहे)

१ बंदुखा इकडे ममईस खरेदी केल्यास दर बारा रुाये प्रो मिळतील तिकडे माहाग पडुन दुपट रुा लागतील याजकरिता इकडेच सोईवार पडेल.

१ खासा सरदार पलटणाचा त्यास रु॥ये २००० तैनात लिहिली आहे परंतु येकाच पलटणास सरदार इतका भारी लागत नाही कंपू अथवा जितकी पलटणे ठेवाल तितक्यास सरदार येकच दर पलटणास वेगला लागत नाही सध्या लोक पाईट साहेबाजवल आहेत आसाम्या

१	खासा सरदार
१	कपतान
५	लेफटण
१	सरजन मेजर
९	सरजन
१	कमोदन
१०	सुभेदार
१०	जमातदार
१८	हवालदार
४०	नाईक
१०	तंबुरची
१०	बासरीवाले
२	कारकून
५००	सिपाई
५	हलकारे
५	मशालची
१०	[भिस्ति]

(यापुढील कागद गहाळ झाला आहे)

सदाशिव आठवले, पुणे

■ ■ ■

BISM Quarterly 65 : 1–4, July 1986–April 1987

Colonial urban growth and the development of imperial policy in the Western Deccan (18th and 19th centuries)

Samita Gupta

N. Wadia College, Pune

European Architecture in India has been a neglected field of study for our art historians. However, this phase of architecture is important as it helps us not only in underscoring the nature of cultural domination, but also in forming an understanding of the close relations between politics and architecture in the colonial period.

The Architecture of the Europeans in India has been called by various names. It is often referred to as "tropical" or " the last phase of Indian architecture " or simply " 19th century architecture ". However, the term " Colonial Architecture " is the most appropriate, as it takes into account the relationship of economic, cultural and political dominance inherent in colonialism which has permitted such architecture and urban forms to occur.

The various urban and suburban spatial forms, as well as public and domestic structures created by the Europeans were an expression of the socio–economic and cultural ethos of the colonial society. They were also a direct expression in brick and stone of the power, structure and hierarchy within the colonial community, and its relationship to the dependant indigenous community.[1]

There were actually two interrelated themes. First, the political, economic and social developments created the

dynamics for urban growth taking both the colonial group and the Indian population. Secondly, the new power-structure and the culture-specific value system of this group led to the creation of an "informal policy" which would be used to complement the imperatives of colonialism and technological superiority.

Bombay (like Calcutta and Madras) was a creation of the British. It was the first major urban control centre to be established by them, though it grew more slowly than the others. This was because of the political situation in the rest of India and the Deccan at the time. Bombay could not grow because British advances were blocked by the threatening shadow of the Maratha Confederacy. The fear of attacks by the Marathas and the need to defend themselves against a possible French threat resulted in the building of fortifications around the factory and settlement at Bombay. Originally this factory was a typical colonial settlement. An old Portuguese manor house had been converted to function as storehouse, office and residential quarters, and was protected by a palisade of mud and wood, mainly to keep out robbers. However, by mid-18th century, a town had been laid out and surrounded by an impressive system of fortifications as a direct result of the threat from the Marathas as well as the French. The new fortifications were a replica of the famous Vauban System of Renaissance Europe.

The intra-mural city developed around a centre point. This was called the Cotton Green,- an open-air warehouse for cotton and other merchandise. This was the business centre, and eventually became, with the harbour, the reason d'etre for Bombay's existence. A walled city now, Bombay became a part of a world wide category of preindustrial cities as classified by Sjoberg.[2]

However, it must be emphasized that the culture which created Bombay, advanced in its homeland from preindust-

rial to a rapid industrial development during the 19th century. The metropolitan cities of England consequently lost their medieval walls and took on the modern urban sprawl. The fact that Bombay retained its preindustrial look and did not spread beyond its limiting walls till much later, is accounted for by the peculiar economic vicissitudes of Bombay Presidency, as well as other limiting factors of the colonial situation. The organic growth of the city was as closely linked with the Company's economic ups and downs, as to its political power.

The defeat of the Peshwa and the annexation of his territories gave Bombay a viable hinterland. This helped the growth of her port and docks. Together with the revolutionary technological advancements in transport and communications, these linked her fortunes with global economy with the consequent changes in her evolution that this implied. So closely had Bombay's economy become linked with the global, that the civil war in the U. S. A. could make or mar individual fortunes in the city. How important to Bambay's urban development was the road through Bhor Ghat; or the first rail tracks laid by the Greater India Peninsular and Bombay Baroda and Central India Railway Companies; or the establishment of the telegraph link with London and the cutting of the Suez Canal, becomes immediately clear. Bombay's linkage to the global and colonial economy later also related to the most significant phase of the city's growth, i. e. the half-century after 1857. This explains why, through the establishment of the colonial exploitative economy, when most of the old manufacturing ports fell into decay, Bombay, which was the creation of the colonists, went from strength to strength.

Pre-industrial Bombay changed for ever, when finally she lost her walls, and the intra-mural city merged into the suburban sprawl to form a metropolis. When this culmina-

tion was reached, the new prosperity and the commercial and imperial pride was given expression through an impressive town-planning and a spectacular building programme. The Cotton Green, the old business centre were transformed into Elphinstone Circle, with an impressive array of Western style structures. These concentrated the mercantile pride in a focal point which emphasized the new role of European finance.

Meanwhile the Esplanade area was transformed with a procession of public buildings which proclaimed the strength and renewed confidence of a government which had just suppressed the 1857 uprising. Bombay was now compared with pride to London or Manchester and her sanitation, road system, water supply etc., were given a complete overhaul.

The dynamics of urban growth and suburban development also has its roots in the socio-cultural vulue-system of its makers. An understanding of the cultural ethos and urban living styles of metropolitan England explains why, almost as soon as the walls of Bombay were completed, the Europeans began to move out creating little suburbs on the outskirts. Similarly, though military exigencies were the early reasons for setting up Cantonments, these soon developed genuinely suburban characteristics. They formed an exclusive residential area for the ruling administrative and military elite. Here the Europeans lived out their life-styles in splendid seclusion in their bungalow-complexes. Away from the sights and sounds of the Indian town which was studiously avoided, they created a controlled landscape according to their culture-specific perceptions. The Cantonments of Bombay, Poona and Ahmednagar fall into the general pattern as described by A. D. King,[8] but vary in certain individual details. In short, they formed an unique solution to a special problem in a colonial situation, where hierarchy, racial exclusiveness and military needs could be preserved

without sacrificing comfort or beauty.

The men responsible for all building and architectural development were members of the ruling class. Upto the late 18th century, these company servants were mainly drawn from the English middle-classes which were beginning to wield considerable power due to their growing wealth. Aristocrats or landed gentry were studiously kept out of the company's service. The early 'Nabobs' swiftly acquiring wealth in India took it back with them, and derived considerable political and economic leverage at home. But while in India they spent part of their wealth in lavish living, often imitating the extravagance of their social superiors in England. They also adapted certain Indian ways, and often had one or several Indian wives. Commercial success also depended upon a certain amount of goodwill of Indian authorities. The English also had respect for some aspects of Indian culture. In the field of architecture, they obviously admired some of the extant Bijapur monuments they saw around them. By the end of the 18th century, however, British political domination was more or less established, and these attitudes changed. The English began to 'turn away' from Indian influences. They also began to cultivate a superior attitude. Their fear of becoming 'Indianized' or 'absorbed' caused them to ridicule and look down upon Indian culture and religion.[4] The image of the avaricious but pleasure loving merchant prince gave way to that of the high-minded and undoubtedly more efficient civil servant. These new type of Englishmen brought new values and attitudes towards India with them.

These changed attitudes were almost exactly contemporary to the rise of Utilitarian philosophy in England. Under its influence, the well-educated civil servants learnt to think of our art and architecture as inferior to those of Greece and Rome. Classical civilization was to them the

most rational and, therefore, most perfect. Their own culture had descended directly from it, but all other cultures, when compared to it, were found wanting. Sincerely believing that the colonial government must also be for the "greatest good of the greatest number," they assumed in the Benthamite fashion, a paternalistic attitude. They felt that they had to improve the morals of the people through education and perhaps through religious change. These attitudes were causally related to the arehitecture of the 19th century.

Their translation into brick and stone can be directly traced on the physical and spatial forms of Bombay :

First, the European areas of Bombay began to look more and more like the towns of England, while the individual structures acquired grandeur through the addition of new-classical elements. Beginning with the Mint and Town Hall (1820's and 1830's) this process continued till the end of the century.

Second, the newly assumed feeling of superiority showed itself in the identification and frequent references to the 'Black' or 'Native' town, which meant the Indian areas. (This happened around the 1830's which was much after similar references in Calcutta or Madras). Relations between Indians and the English were always better in Bombay due to its mercantile base. There had never been a structural barrier between the two parts of the town as in Madras, but from quite early stages the northern part was settled by Indians closely clustered together in caste, communal or occupational groups. The southern part settled by Europeans was more spacious, laid out with broader and straighter roads and larger blocks. However, from this time on, the differences were further accentuated. Most of the new planning was reserved for the southern part. The northern areas became more and more crowded till the town present-

ed a dual aspect – as if they were two different worlds altogether.[5]

Third, the growth of British power was now to be emphasized through an architectural policy which sought to impress and dazzle the local population with the stability and reality of that power. His superior identity and his un-Indianness had to be shown by emphasizing his Europeaness, pomp and show and huge buildings would together create an aura of invincibility and awe the people with the power of the Raj,[6] while it would also ensure that the English did not become absorbed into the Indian mass like her early invaders.

Aggressive imperialism and Benthamite paternalism both were thus served by the new architectural policy. This cultural imperialism was further augmented by the education policy which was keyed to the Macaulian imperatives. The establishment of the art schools on government initiative performed the same function. The offical aim of setting them up was to revive and encourage native craft traditions, but in the end they only served to destroy them further. The students were taught to believe like their English masters that they had no inherent aesthetic perceptions and therefore had to learn ro 'see' with European eyes.[7] They learnt to ignore their own artistic traditions and develop attitudes of superiority towards it.

Lastly, an interesting factor arises. Most of the buildings, though built according to government designs; were often largely financed by Indian citizens. The rich merchant families of all communities, but specially the Parsis, gave handsome donations, but did not insist on a more Indianized style. It was this class which had enthusiastically taken to Western education. It is also interesting to note that as early as 1860's they were ready to perceive the beauty of the neo-

Gothic revival and take part in a grand collaborative venture with the government.

Colonial superiority and the influence of Utilitarianism thus transformed the small group of the colonial ruling class into a cultural elite, expressing their pride and superiority in the architectural language of the Gracco-Roman and Neo-Gothic forms. As if they were emphasizing their link or continuity not only politically and administratively with the Imperial Rome, but also with its cultural tradition. This idea is crystallized by T. Roger Smith, an architect who had worked in India, in a speech delivered to his English audience in 1873 : "We ought, like the Romans and the Mohammedans, to take over national style with us. Our buildings ought to hold up a high standard of European art. They ought to be European, both as a rallying point for ourselves, and as raising a distinctive symbol of our presence to be beheld with respect and even with admiration by the natives of the country."[8]

